शुक्रवार, 30 सप्टेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 58
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 30 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-58 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

## चर्चेतली बातमी

### सुप्रिया सुळे यांच्या विधानाचा बावनकुळे यांनी घेतला समाचार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शरद पवार यांचे नाव घेत इंदापूरमध्ये मोठे विधान केले आहे. शरद पवार विरोधात गेले की दौऱ्यावर निघतात. पण त्या दौऱ्यामध्ये काय गंमत होते माहिती नाही. त्यांचा महाराष्ट्राचा दौरा झाला की ते पुन्हा सत्तेत येतात, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. सुळे यांच्या विधानाचा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनुकळे यांनी समाचार घेतला आहे. आता तो काळ गेला. आता स्वतःला सिद्ध करावे लागते. सुप्रिया सुळे यांना पराभूत करण्यासाठी कोणताही स्टार उमेदवार देण्याची गरज नाही. भाजपाचा कोणताही उमेदवार त्यांचा पराभव करू शकतो, असे बावनकुळे म्हणाले. शरद पवार यांचे नाव वापरून त्यांचे, काम वापरून किती दिवस मोठे व्हाल. स्वतःचे कर्तृत्व दाखवावे लागेल. शरद पवार यांनी त्यांच्या जीवनात काम केलं. मात्र त्यांच्या कामावर दुसरे किती दिवस तग धरतील. आता तो काळ गेला आहे. जो पदावर आहे, तो किती काम करतो, असे जनता विचारत आहे, असे बावनकुळे म्हणाले.

# ऑपरेशन गरुड यशस्वी

## ड्रग्स माफियांवर मोठी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : नुकतीच एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि ईडीनं देशभरात विविध ठिकाणी केलेल्या संयुक्त छापेमारीमध्ये पीएफआय या संघटनेवर मोठी कारवाई करण्यात आली. यानंतर आता पुन्हा एकदा देशातील तपास यंत्रणांनी केलेल्या एका मोठ्या संयुक्त कारवाईमध्ये देशातील ड्रग्स माफियांना मोठा झटका दिला आहे.**

सीबीआयनं या संपूर्ण मोहिमेचं नियोजन केलं होतं. 'ऑपरेशन गरुड' अंतर्गत देशभरात ही छापेमारी करण्यात आली. यामध्ये सीबीआयसोबत अंमली पदार्थविरोधी विभाग (NCB) आणि वेगवेगळ्या राज्यांच्या पोलीस दलाचाही समावेश होता. विशेष म्हणजे या मोहिमेत इंटरपोललाही सहभागी करण्यात आलं होतं. त्यामुळे हा ड्रग्स माफियांना मोठा झटका मानला जात आहे. गुरुवारी ऑपरेशन गरुडअंतर्गत तपास यंत्रणांनी देशभरात विविध ठिकाणी छापा टाकून तब्बल १७५ जणांना अटक केली आहे. यासंदर्भात एकूण १२७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पंजाब, हरयाणा, गुजरात, महाराष्ट्र, तमिळनाडू, दिल्ली आणि मणिपूर या राज्यांमध्ये प्रामुख्याने ही छापेमारी करण्यात आल्याची माहिती तपास यंत्रणांकडून देण्यात आली आहे. या छाप्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर ड्रग्स ताब्यात घेण्यात आल्याचंही सांगण्यात आलं आहे.




## महत्वाची बामती

### हिंदू समाजाची भुजबळ यांनी माफी मागावी : भाजप

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सरस्वती देवीच्या प्रतिमा शाळेत कशासाठी, असे विधान करून नवरात्रीच्या सणात हिंदूंच्या धार्मिक भावना दुखाविल्या प्रकरणी राष्ट्रवादीचे माजी मंत्री छगन भुजबळ यांनी तातडीने माफी मागावी, अशी मागणी भारतीय जनता पक्षाने केली आहे. माजी मंत्री छगन भुजबळ यांनी माफी न मागितल्यास भाजपच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा भाजपा शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री छगन भुजबळ यांनी केलेल्या वादग्रस्त विधानाचा निषेध करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने तांबडी जोगेश्वरी मंदिरासमोर आंदोलन करण्यात आले. या वेळी मुळीक बोलत होते. सरचिटणीस गणेश घोष, राजेश येनपुरे, संदीप लोणकर, दत्ता खाडे, दीपक पोटे, प्रमोद कोंढरे, रवींद्र साळगावकर, सचिन मोरे यांच्यासह कार्यकर्ते आणि पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. सत्ता परिवर्तन झाल्यानंतर महाविकास आघाडीचे नेते सैरभैर झाले आहेत. विकासकामांची दूरदृष्टी नसल्याने काही मंडळी बेताल वक्तव्य करीत आहेत.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठाण्यात रश्मी ठाकरे यांचे ठाकरे समर्थकांनी जोरदार स्वागत केले. त्यानंतर रश्मी ठाकरे यांनी आनंद दिघे यांच्या टेंभी नाका इथल्या देवीचे दर्शन घेतले.

# हिमाचल प्रदेश काँग्रेसमध्ये गळती सुरूच

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** हिमाचल प्रदेशमध्ये विधानसभा निवडणूक जवळ आली आहे. मात्र, निवडणुकीपूर्वीच काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि प्रदेश कार्याध्यक्ष हर्ष महाजन यांनी काँग्रेस पक्षाचा राजानामा देत भाजपामध्ये प्रवेश केला आहे. केंद्रीय मंत्री पियूष गोयल आणि भाजपाचे राष्ट्रीय सचिव विनोद तावडे यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्षप्रवेश पार पडला. भाजपात प्रवेश केल्यानंतर हर्ष महाजन यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, गेली ४५ वर्ष मी काँग्रेसमध्ये होतो. मी अनेक महत्त्वाची पदं भूषवली आहे. मात्र, आता काँग्रेस दिशाहीन होत असल्याने मी पक्षाचा राजीनामा दिला आहे. येत्या निवडणुकीत भाजपा मोठ्या मताधिक्याने जिंकणार आहे. कारण भाजपाकडे नरेंद्र मोदी यांच्यासारखा प्रसिद्ध चेहरा आहे. हर्ष महाजन यांच्या भाजपात जाण्याने काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. गेल्याकाही काही दिवसांत खिमी राम, आमदार लखविंदर राणा आणि पवन काजल, यांच्यासह अनेक काँग्रेस नेत्यांनी भाजपात प्रवेश केला आहे. दरम्यान, महाजन यांच्या भाजपा प्रवेशाबाबत बोलताना हिमाचल प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष नरेश चौहान म्हणाले, महाजन यांनी काँग्रेससाठी इतके वर्ष काम केले. त्यामुळे त्याचं पक्ष सोडून जाणं अत्यंत दुर्दैवी आहे. त्यांनी हा निर्णय का घेतला, याबाबत आम्हाला कल्पना नाही. चार दशकाहून अधिक काळ काँग्रेसमध्ये राहिलेले हर्ष महाजन यांनी काँग्रेसमध्ये अनेक महत्त्वाची पदं भूषवली. त्यांनी काँग्रेसच्या विद्यार्थी संघटनेपासून सुरुवात केली होती. जवळपास १० वर्षे ते एनएनयुआयचे अध्यक्ष होते. महाजन हे १९९८ ते २००३ दरम्यान चंबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार होते. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांची याच वर्षी पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

# अशोक चव्हाण यांनी केलेल्या गौप्यस्फोटात तथ्य : जयंत पाटील

## पंकजाताई मुंडे यांचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न मागील काही वर्षात सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** २०१४ साली अशोक चव्हाण यांची एकनाथ शिंदे यांनी भेट घेऊन शिवसेना - कॉंग्रेस आघाडीबाबत चर्चा केली असा अशोक चव्हाण यांनी गौप्यस्फोट केला असेल तर त्यात तथ्य असणे स्वाभाविक आहे असे मत व्यक्त करतानाच सध्या मुख्यमंत्र्यांनी जी युती केली आहे ती कशासाठी केली हे संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी लगावला. आदरणीय शरद पवारसाहेबांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी बैठक पार पडल्यानंतर जयंत पाटील यांच्याशी माध्यमांनी संवाद साधला. पंकजाताई मुंडे यांना भाजप म्हणावे तितके महत्त्व देत नाही हे स्पष्ट झाले आहे. त्यांना थोडंसं बाजूला काढण्यात आले आहे. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी महाराष्ट्रात भाजप वाढवण्यासाठी मोठे कष्ट घेतले. मुंडे साहेबांना मानणारा एक मोठा वर्ग आहे, पंकजाताई मुंडे यांनाही तो वर्ग पाठिंबा देतो. त्यामुळे त्यांचे महत्त्व कमी करण्याचे काम मागील काही वर्षात सुरु आहे म्हणून त्यांनी आपले मत खंत म्हणून व्यक्त केले आहे असेही जयंत पाटील म्हणाले.

मराठा तरुणांबद्दल आणि समाजाबद्दल मंत्री तानाजी सावंत यांनी वक्तव्य केले ते अत्यंत धक्कादायक आहे. तीच भूमिका मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांची आहे फक्त ते मांडत नाहीत तानाजी सावंत ते मांडत आहेत असा टोला जयंत पाटील यांनी यावेळी लगावला.


आता मुख्यमंत्र्यांनी सगळ्या मंत्र्यांना कमी बोलण्यास सांगितले असले तरी माणसाचा



स्वभाव जात नाही इथे तर वेगवेगळ्या स्वभावाचे लोक एकत्र झाले आहेत. आता एकनाथ शिंदे यांनी सांगितले तरी माईक समोर आल्यावर मनातल्या सगळ्या गोष्टी व्यक्त करण्याची प्रथा आणि इच्छा बऱ्याच जणांची जागृत होताना दिसते असा खोचक टोलाही जयंत पाटील यांनी तानाजी सावंत यांना लगावला.

सुरुवातीला मोदीसरकारकडून सर्वांना गॅस सिलेंडर वापरण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले त्यानंतर सर्वांनी सिलेंडर घेतल्यावर सबसिडी कमी करण्यात आली म्हणजे गॅसचा व्यवसाय मोदी सरकार करतंय असं वाटायला लागले आहे असा हल्लाबोल जयंत पाटील यांनी केला. आता सिलेंडर वापरावर बंधन आणणे म्हणजे खुल्या बाजारात जो दर असेल (उदाहरणार्थ दोन - अडीच हजार रुपये ) त्याच दरात जनतेने गॅस सिलेंडर खरेदी करावा लागणार आहे असा त्याचा अर्थ आहे मात्र या सरकारच्या धोरणामुळे सर्वसामान्य जनतेला व मध्यमवर्गीय नागरिकांना फार मोठी किंमत मोजावी लागणार आहे असा आरोपही जयंत पाटील यांनी केला.

नितीन गडकरी यांनी खरे बोलण्यापेक्षा वस्तुस्थितीचं वर्णन केले आहे. देशात ज्याच्याकडे भांडवल जास्त आहे त्याला महत्व प्राप्त झाले आहे. श्रीमंत लोकांची संख्या मूठभर आहे आणि गरीब लोकांची संख्या प्रचंड मोठी आहे. आपल्या देशाची संपत्ती ठराविक लोकांच्यामध्ये वाटली गेली आहे. देशातील फार मोठा वर्ग हा संपत्तीपासून लांब राहिला आहे त्यामुळे श्रीमंत आणि गरीब याच्यातील दरी ही मागच्या काळात जेवढी होती ती मागील सात - आठ वर्षांत वाढलेली दिसत आहे. असा निष्कर्ष अनेक अर्थतज्ज्ञांनी काढला आहे तेच पुन्हा नितीन गडकरी आपल्या भाषणात आणि वक्तव्यातून बोलत आहेत असेही मत जयंत पाटील यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना व्यक्त केले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# महिलांचा आंदोलनातील सहभाग - अशिक्षित किंकरी देवीचे योगदान

आधुनिक केसरी

' People's Action for People in Need ' या स्थानिक स्वयंसेवी संघटनेची मदत किंकरी देवीला मिळाली. या संघटनेच्या मदतीने ती या खाणमालकांच्या विरोधात उभी राहिली. सिमल्याच्या उच्च न्यायालयात तब्बल ४८ खाणमालकांविरुद्ध १९८७ साली तिने दावा दाखल केला. खाणमालक श्रीमंत असल्याने उत्तम वकील लावून त्यांनी केसचा निकाल लांबवण्याचा बराच प्रयत्न केला. आपल्या केसवर न्यायालय लवकर निकाल देत नाही हे पाहिल्यावर किंकरी देवी स्वतः सिमल्याला गेली आणि तेथील न्यायालयासमोर तिने उपोषण सुरु केले. या दरम्यान या केसच्या खर्चासाठी तिला आपले जपून ठेवलेले मंगळसूत्र सुद्धा मोडावे लागले. तिच्या



एक लढा असाही (भाग-6)

उपोषणाची दखल तब्बल १९ दिवसानंतर न्यायालयाने घेतली. तोपर्यंत या अशिक्षित असलेल्या किंकरी देवीच्या असामान्य लढ्याची दखल वर्तमानपत्रांनी घेतली होती. तिचे नाव देशातच नव्हे तर विदेशात जाऊन पोहोचले. किंकरी देवी खाणमालकांकडून पैसे उकळण्यासाठी ही केस लढत आहे आणि आम्ही खाणींचे उत्खनन करताना कोणतेही पर्यावरणाचे नुकसान करत नाही असा बचाव खाणमालकानी केला. पण न्यायालयाने किंकरी देवीची बाजू ग्राह्य धरून निकाल दिला. या निकालाने न्यायालयाने हिमालयातील खाणींच्या उत्खननावर बंदी आणली. किंकरी देवीला मोठ्या प्रयासानंतर न्याय मिळाला. या दरम्यान खाणमालक तिच्या जीवावर उठले. त्यांनी तिला मारण्याचा देखील प्रयत्न केला पण निसर्गावर अत्याचार करणाऱ्या खाणमालकांच्या विरोधात लढाईचा ठाम निर्धार तिने केला होता. मृत्यूची भीती न बाळगता आपला लढा तिने सुरूच ठेवला. खाणमालक या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात गेले. **(क्रमशः)**




## आनंदी पहाट

# मनावर सुविचारांची पेरणी करत राहावी

आधुनिक केसरी

चांगले ऐकावे, चांगले बघावे, चांगले वाचावे, चांगले वागावे, वाईटाकडे दुर्लक्ष करावे, अन्यायाला वाचा फोडावी, सुशिक्षितांच्या, विद्वानांच्या, हुशार विद्यार्थ्यांच्या, थोर समाजसेवकांच्या संपर्कात, सानिध्यात राहून स्वतःच्या मनावर सुविचारांची पेरणी करून घ्यावी. हे सर्व करत असताना स्वतःमध्ये नम्रता असली पाहिजे हे मात्र विसरून चालणार नाही. कालांतराने उणिवमुक्त झाल्यामुळे अशा व्यक्तीचा पत्ता शोधत शोधत एक दिवस नक्कीच यश दारावर येऊन धडकते. एकमेकांच्या उणिवा दूर करणे आणि जाणीवा जपणे ही प्रेरणा ह्याच मैत्रीतून मिळत असते. काहीवेळा परस्परांमध्ये स्पर्धा देखील होत असते. पण ह्या स्पर्धेत कोणीही जिंकले तरी आनंद सर्वांनाच होत असतो. बाभळीच्या झाडाशेजारी केळीचे झाड वाढले, तर बाभळीच्या काट्याने त्याची सर्व पाने फाटून जातात; या उलट चंदनाच्या झाडाशेजारी लिंबाचे झाड वाढले, तर लिंबाच्या गाभ्याला चंदनाचा सुगंध यायला लागतो. ज्या प्रमाणे रामाच्या सहवासात हनुमान धन्य झाला, श्रीकृष्णाच्या सहवासाने अर्जुन सर्वश्रेष्ठ योद्धा झाला, याउलट दुर्योधनाच्या सहवासाने भीष्म, कर्ण सर्वश्रेष्ठ असूनही त्यांचा विनाश झाला. आपण ज्यांच्या सोबत रहातो, वावरतो, त्यांच्या विचार, वर्तन आणि व्यवहारांचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. त्यानुषंगाने आपल्या मूळ प्रकृतीत बदल घडत येऊन प्रत्येक बाब त्यांच्यासारखीच आपल्या कृतीतून दिसून येऊ लागते. काहीवेळा 'सुसंस्कारित मुले ते गुंड, चोर' अशा ह्या परिवर्तनाला काही प्रमाणात कारणीभूत ठरतो, तो आपल्या मित्रमैत्रिणींचा सहवास.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शाळा-महाविद्यालयांत गेल्यावर सगे-सोबती, साथ-संगत चांगली मिळाली नाही म्हणून तरुण वयांतील मुले-मुली वाममार्गाला गेल्याचे ऐकण्यांत आणि पाहण्यात येते. प्रेरणा घेऊन एखाद्या मित्राचे अनुकरण करून वाईट सवयी लावून घेणे, अर्वाच्च भाषेत बोलणे, व्यसनाधीन होणे अपायकारक आणि हानिकारक असल्याची जाणीव होणे महत्वाचे असते.



आधुनिक केसरी

## सात्त्विक छायेत | ध्यान करी ||

चिंतन मनन | अखंड करावे ||
विद्येस भजावे | रात्रंदिन ||१||

आळस करतो | घात आयुष्याचा ||
काळ तारूण्याचा | मौल्यवान ||२||

आळवाचा थेंब | यौवन जपावे ||
संयमी रहावे | दोषमुक्त ||३||

सज्जनांचा संग | दुर्जनांचा त्याग ||
उत्तम हा योग | सुखदायी ||४||
गुंतू नको मना | पाशवी मायेत ||
सात्त्विक छायेत | ध्यान करी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी

**जगदम्ब नमस्तुभ्यमनुकम्पास्वरूपिणि।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं चन्द्रकलासुशोभिते।। २८ ।।**
हे अनुकंपास्वरूपिणी, जगदंबिके, तुला नमस्कार असो.
भाळी चंद्रकोर शोभणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यं सुतप्रमोदकारणम्।**
**विश्वमातर्नमस्तुभ्यं सकलसिद्धिकारणम्।। २९ ।।**
आपल्या सुतांच्या प्रमोदाचे कारण असणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. सकलसिद्धींचे कारण असणारे, विश्वमाते, तुला नमस्कार असो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# नवरात्राची पाचवी माळ



आधुनिक केसरी

आज अश्विन शुद्ध पंचमी 30/9/2022 शुक्रवार



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आज आपण देवीला पाचवी माळ वहाणार आहोत. नवदुर्गाच्या रूपात आपण देवीला पहातो तिची मनोभावे पूजा करतो .मनुष्य उत्सवप्रिय असतो. या सणसमारंभाने संस्कृतीचे संवर्धन होते त्याच बरोबर आत्मिक आनंद मिळतो. उपवास म्हणजे काही न खाता आपले विहितकर्म करत देवीची आराधना करायची म्हणजे इंद्रियांवर विजय मिळवायचा पायात चप्पल घालायची नाही. देवी असुराशी लढताना तिला किती त्रास सहन करावा लागला असेल आपणही तिच्या साठी काहीतरी करावे म्हणजे त्याग करावा या हेतुने भक्तगण नवरात्रात चप्पल घालत नाहीत. तर काहींच्या मते प्रत्यक्ष देवी भुतलावर आली तिच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी सुध्दा भक्तगण चप्पल घालत नाहीत. सत्वगुण वाढीस लागतो म्हणून या सर्व प्रथा परंपरा आहेत. जो देवीसाठी उपवास करतो,जेवण पानतंबाखू सोडतो,मांसाहार करत नाही फक्त नेमाने देवीचे ध्यान, जप करतो कठोर भाषा वापरत नाही. सतत सात्विकता जपतो प्रतिभा जागी ठेवतो,बुध्दी आत्मप्रकाशाने तेवत ठेवतो "नंदादीप"अहोरात्र तेवतो त्याप्रमाणे मन पूर्णपणे देवीच्या भक्तित समर्पित करतो ध्यान करताना डोळ्यातून अखंड अश्रूधारा येतात देवीच्या प्रेमापुढे ज्याला स्वतः च्या देहाचे विस्मरण घडते तो खरा भक्त होय. देवीचा गोंधळ घालतात तेव्हा सुध्दा आपल्यातील वाईटांचा त्याग व सन्मार्गाचा सन्मान सोहळा हाच त्याच्या मागे भाव असतो. अनेक द्वदेवतांना गोंधळाला बोलवले जाते समाजातील सर्व स्तरातील लोक एकत्र गुण्यागोविंदाने रहावेत असा संदेश यामागे आहे. तुम्ही गोंधळाची गाणी समजून घेतली तर याचा अर्थ समजेल. नाथांची भारूडे,गौळणी ही सर्व साहित्य संपदा अभ्यासली तर नवरात्रातील भक्तिचा परमोच्च क्षण भक्त अनुभवतात याची प्रचिती येते. अज्ञानी लोकांना भारूड,लोकगीते, जागरणगोंधळ,भजनपूजन,भोंडला किंवा हातगा या सर्व मौखिक वाडःमय प्रकार भक्तांना सत्वगुणांची परमोच्च पातळी गाठायला लावतो. नवरात्राची पाचवी माळ यालाच
ललितापंचमी असेही म्हणतात.देवी ही सुख समाधान देणारी सर्वांचे कल्याण करणारी अशी आदिशक्तिच्या, आदिमाया आहे ती खुपच दयाळू आहे

अब्जवासे नमस्तुभ्यं
चपलायै नमो नमः।
चंचलाये नमस्तुभ्यं।
ललितायै नमो नमः।
परिपालय भो मातर्मा
तुभ्यं शरणागतम्

# चराचरात पाहिली म्या आई-अंबाबाई

## पाचवी माळ

आधुनिक केसरी

नवरात्र -उत्सवाची आजची पाचवी माळ ललिता पंचमी हा आजच्या माळेचा दिन-विशेष आहे .देवीची नवरात्र आरती म्हटले की अश्विन शुद्ध पक्षी अंबा बैसली सिंहासनी हो..।। ही आरती आठवते. लहानपणापासून कानावर पडत आलेली आरती ..नवरात्र दिवसात अजून पूर्ण पाठ असून ..ती म्हणता येते या भावनेचा आनंद घेणारी मंडळी घरोघरी आहेत. या आरतीत आजच्या पाचव्या मालेचे वर्ण किती छान आहे - हे बघा पंचमीच्या दिवशी व्रत ते उपांग ललिता हो | अर्घ्यपाद्यपूजने तुजला भवानी स्तविती हो | रात्रीचे समयी करिती जागरण हरी -कथा हो | आनंदे प्रेम ते आले सदभावे क्रीडता हो | उदो बोला उदो बोला अंबाबाई माउलीचा हो | आजच्या आठवणीत मी तुम्हाला गावोगावीच्या देवीच्या दर्शनाला घेऊन जातो आहे...चला तर .करू या सुरुवात .. थेट माझ्या लहानपणीच्या काळात ..हा काळ आहे १९६० -ते ६४. या दरम्यानचा ..म्हणजे ६२ वर्षांपूर्वीचा मी १० -ते १४ या वयोगटात असतांना ..आम्ही औरंगाबाद जिल्ह्यातील -वैजापूर या गावी होतो. गावा बाहेर -नदीच्या पलीकडे देवीचे मंदिर होते नवरात्री निमित्ताने आणि ,इतर वेळीही या मंदिरात देवी दर्शनासाठी लोक नेहमी येत असतआता ही येत असतीलच, मंदिरच्या बाहेर लहानपणीच्या नजरेला खूप मोठी वाटणारी ..दीप माळ 'क्षणभर थांबवून घेई. देवीचा गाभारा आणि समाई आणि दिव्यांच्या प्रकाशात ..देवीचे तेजोमय दर्शन ..मनावर अगदी आजतागायत कोरलेले आहे. छोटीशी यात्रा असायची ..लाल रंगाचे बेगडी चष्मे , छोटी बासरी फुगे ..ही खेळणी भारी भारी वाटयची. दर्शन घेऊन बाहेर पडले की ..नदीला असेल तेव्हढ्या पाण्यात उड्या मारायच्या ही ठरलेली गोष्ट . हे सगळे आठवतांना अजून एक आठवण आहे -..इथे दोन नद्यांचा संगम आहे ..त्यांची नावं ..नारिंगी -सारंगी. आज या ठिकाणी नेमक काय नि कसे असेल ? माहिती नाही ..कारण वैजापूर हे गाव सोडल्यावर पुन्हा एकदा ही तिथे मला जाण्याचा योग आला नाही ..म्हणून कदाचित ..या लहानपणीच्या आठवणी .आपोआपच ताज्या होत असाव्यात. पुढे सत्तरच्या दशकात - आष्टी जि.बीडच्या वास्तव्यात देवी -निमगाव "येथील देवीच्या दर्शनास २-३- वेळेस बैलगाडीत बसून गेल्याचे आठवते. उदगीरला असतांना ..आम्हाला आजोळी -जिंतूर या गावी यायचे असे ..त्यासाठी ७५-७६ मध्ये जिंतूर-डेपोची ..जिंतूर -उदगीर -जिंतूर ही बस सुरु झाली. आमच्यासाठी ..मामाच्या गावाला घेऊन जाणारी बस फार आवडती होती. उदगीर - जिंतूर -मार्गे राणीसावरगाव असा हा मार्ग आणि या ठिकाणी असलेले देवीचे मंदिर पंचक्रोशीतले मोठे महत्वाचे स्थान आहे. इथे ब्रेक घेऊन ..देवी दर्शन घेतल्यावर पुढचा प्रवास अधिक सुखकर होत असे. १९७९ पासून आमचे पारिवारिक मुख्यालय -औरंगाबाद झाले ..मिल कॉर्नर, अजब नगर, स्टेट बँक ऑफिसर कोलोनी, ज्योतीनगर अशा वेगवेगळ्या भागात आम्ही राहिलो. माझ्याकडे कुलाचार म्हणून देव आले ते १९९३ मध्ये ..तो पर्यंत प्रत्येक सणाला मी आणि माझे फॅमिली युनिट प्रत्येक सणासाठी घरी -औरंगाबादला येत असू.. नवरात्रीत ..आम्हाला .. कर्णपुरा देवी दर्शन ,आणि भरलेली यात्रा असा दुहेरी आनंद मिळायचा रंगार गल्लीतील .हिंगुलाम्बिका माता "या ठिकाणी आठवणीने जात असे. ज्योतीनगरला असतांना माझ्या आई-वडिलांनी संग्राम नगर देवीच्या मंदिरात वास्तव्यास असलेलीस. सोनई- महाराजांचा गुरुमंत्र घेतला ..तेव्हा पासून संग्रामनगर मधील देवी दर्शन घेणे हा आमचा पारिवारिक उपक्रम झाला. १९८६-ते २००६ या काळात परभणीच्या सलग वास्तव्यात परभणीच्या ग्रामदेवतेचे - गांधी -पार्क जवळच्या चौकातले अष्टभुजा देवीचे मंदिर कायम भक्तांच्या गर्दीने गजबजून गेलेले पाहायला मिळे मंगळवार आणि शुक्रवार ..तसेच नवरात्र ..या सगळ्या पर्वकाळी श्रीअष्टभुजा देवी दर्शन घडायचे. पुढच्या काळात - नव्याने विस्तारित गेलेलेया परभणी शहरातील आमच्या श्रीराम नगर बँक कॉलनी जवळील आशीर्वाद नगर मध्ये "देवीचे खूप छान मंदिर झाले.

## जागर देवी दर्शनाचा



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# छापा टाकत पोलिसांनी गांजा शेती केली उद्ध्वस्त

## शिरपूर तालुक्यातील सांजापाडा फत्तेपूर येथील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर तालुका पोलिसांनी गांजा शेती उध्दवस्त केली आहे. तब्बल १४ लाखांची पाच ते सहा फुटांची गांजाची झाडे जप्त करण्यात आली. तर एकास ताब्यात घेण्यात आले आहे. फत्तेपूर शिवार सांज्यापाडा येथे राहणारा जामसिंग जसमल पावरा याने स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी वन शेतात मानवी मेंदूस परिणाम करणाऱ्या प्रतिबंधीत गांज्या अंमली पदार्थ वनस्पतीची लागवड केली असल्याची गोपनिय माहिती शिरपूर तालुका पोलिस ठाण्याचे सपोनि सुरेश शिरसाठ यांना मिळाली. याबाबत त्यांनी पोलीस अधिक्षकांना माहिती दिली. त्यांच्या आदेशाने प्रादेशीक परिवहन अधिकारी सुनिल पाटील यांना सोबत घेत काल दुपारी त्या शेतात छापा टाकला. शेतात काही पिकांच्या आड गांजाची 5 ते 6 फुटांची झाडे दिसून आली. ती मुळासकट उपटून एकुण 14 लाख 46 हजार 600 रुपये किंमतीचे एकूण 482 किलो गांजा सदृश्य अंमली पदार्थाची झाडे जप्त करण्यात आली. तसेच जामसिंग पावरा यालाही ताब्यात घेतले. त्याच्याविरोधात शिरपूर तालूका पोलिसात एनडीपीएस कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोसई संदीप पाटील यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधिक्षक प्रविणकुमार पाटील, अपर पोलीस अधिक्षक प्रशांत बच्छाव व उपविभागिय पोलीस अधिकारी दिनेश आहेर यांच्या मार्गर्शनाखाली सपोनि सुरेश शिरसाठ, पोसई. संदीप पाटील, भिकाजी पाटील, असई के.एस.जाधव, पोहेकॉ संजय सुर्यवंशी, चतरसिंग खसावद,पवन गवळी, जगदीश मोरे, पोना प्रविण धनगर, संदीप ठाकरे,अरिफ पठाण, संदीप शिंदे, भुषण चौधरी, अनिल शिरसाठ, मोहन पाटील, पोकॉ जयेश मोरे, योगेश मोरे, प्रकाश भिल, रोहिदास पावरा, कृष्णा पावरा, संतोष पाटील, इसरार फारुकी व आरसीपी पथकाने केली आहे.



# सामान्य व्यक्तींचे उत्थान, राष्ट्रनिर्मितीतील खरे योगदान : राज्यपाल

## भारत विकास परिषदेच्या पश्चिम क्षेत्र संमेलनात प्रतिपादन




आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** कुटुंबातील व्यक्तींबद्दल ज्या उत्कटतेने आपण विचार करतो तीच उत्कटता आणि प्रयत्नांची पराकाष्ठा समाजपरिवर्तनासाठी प्रत्येकामध्ये असली पाहिजे. सामान्यातील सामान्य व्यक्तींचे उत्थान केले तरच राष्ट्रनिर्मितीमधे आपण खरे योगदान देऊ शकतो, असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी केले. भारत विकास परिषदेच्या पश्चिम क्षेत्र संमेलन 'उत्कर्ष'च्या उद्घाटन प्रसंगी राज्यपाल बोलत होते. गुरुवारी कविवर्य सुरेश भट सभागृहात पश्चिम क्षेत्र संमेलन 'उत्कर्ष' तसेच, प्रबुद्ध जन संमेलन व चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत विकास परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. गजेंद्रसिंह संधू होते तर केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभली. व्यासपीठावर सीए ब्रिजकिशोर अग्रवाल, भारत विकास परिषदेचे क्षेत्रीय अध्यक्ष सुधीर पाठक, प्रांत अध्यक्ष चंद्रशेखर घुशे यांचीही उपस्थिती होती. गेल्या 8 वर्षात देशने वेगाने उत्कर्ष केला आहे. सर्वांनी अधिक मोठ्या जोमाने संपर्क, सहयोग, सेवेच्या माध्यमातून उत्साहाने काम केल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 5 मिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न वेळेच्या आधीच पूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही, असे राज्यपाल म्हणाले. भारत विकास परिषदेच्या देशभरातील कार्याचा गौरव करताना राज्यपालांनी सांगितले की नागपुरातील 'उत्कर्ष' संमेलनाच्या मध्यमाने संपर्क, सहयोग आणि सेवा अधिक बळकट करून तळागाळातील लोकांच्या उत्थानचे कार्य सुरू ठेवावे. ब्रिजकिशोर अग्रवाल म्हणाले, ग्रामीण भागातील लोकांचे उत्थान काळाची गरज असून भाविप वनवासी लोकांचा विकास, गरिबांचे उत्थान करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक आघाड्यांवर कार्यरत आहे. भाविपने समाजातील तळागाळातील लोकांना सधन लोकांसोबत जोडून एक साखळी तयार करण्याचे कार्य सुरू असून सर्वांनी या देशकार्यात सहभागी व्हावे, असे गजेंद्रसिंह संधु यांनी उपस्थितांना आवाहन केले. प्रास्ताविकातून भाविपच्या विविध प्रकल्पांची माहिती देताना सुधीर पाठक म्हणाले, भाविप आगामी 25 वर्षात समाजोपयोगी स्थायी प्रकल्प उभारू इच्छिते. कार्यक्रमाच्या संयोजिका सीमा मुनशी, पल्लवी कुळकर्णी, चंद्रशेखर घुशे यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीमा मुनशी व लक्ष्मीनिवास जाजू यांनी केले. यावेळी दानशूर विकास रत्न पुरस्कार देऊन दानदात्यांचा सत्कार करण्यात आला.

### स्वामी विवेकानंदांचे स्वप्न पूर्ण करण्याची ही वेळ : गडकरी

स्वामी विवेकानंद यांनी 21 वे शतक हिंदुस्तानचे असेल असे म्हंटले होते . त्यांचे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारत विकास परिषदेने दूरदृष्टी, गती आणि नियोजन ठेऊन भविष्यातील वाटचाल करावी, अशी सूचना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केली . देशातील 124 आकांशीत जिल्ह्यांमध्ये अनेक समस्या असून तिथे विकासाला भरपूर वाव असल्याचे ते म्हणाले . या जिल्ह्यामध्ये काम होण्याची अपेक्षा असून गावांना समृद्ध कसे करता येईल याकडे लक्ष केंद्रित करावे असे आवाहन त्यांनी भाविपला केले . भाविपच्या स्मरणिकेचे गडकरी यांचया हस्ते प्रकाशन करण्यात आले . दुपारच्या सत्रात विवेकानंद केंद्र कन्याकुमारीच्या उपाध्यक्षा निवेदिता भिडे व प्रकाश पाठक यांचे उद्बोधन झाले . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिलीप गुलकरी, मिलन काळे, कौतुभ लुले, मुकुंद सापणेकर, पद्माकर धानोरकर,अनिल घुळघुळे, छाया शुक्ला,आसावरी वरकड,सीमा मुनशी, संजय गुलकरी, सारिका पेंडसे, गुप्ता जी , वैदेही व स्नेहल रानडे यांचे सहकार्य लाभले .

# ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यातील ७५ वर्षांवरील नागरिकांना एसटीच्या सर्व प्रकारच्या बसमधून मोफत प्रवास करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केली. त्यानंतर एसटी प्रवासाला एक महिन्यात ज्येष्ठांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळू लागला आहे. २६ ऑगस्ट २०२२ ते२६ सप्टेंबर २०२२ दरम्यान राज्यभरातून ५४ लाख ५८ हजारांहून अधिक ज्येष्ठ नागरिकांनी एसटीतून मोफत प्रवासाचा लाभ घेतला आहे, अशी माहिती एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी दिली. ७५वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एसटीच्या सर्व सेवांमधून मोफत प्रवास तर ६५ ते ७५वर्षादरम्यानच्या नागरिकांनाही सर्व सेवांमधून ५० टक्के सवलतीमध्ये प्रवास करता येईल, अशी घोषणा माननीय मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांनी पावसाळी अधिवेशनात केली होती. २५ ऑगस्ट, २०२२ रोजी माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ज्येष्ठांनामोफत प्रवास योजनेसाठी प्रमाणपत्राचे वितरण आणि योजनेचा शुभारंभ झाला होता.त्यानंतर ज्येष्ठ नागरिकांचा २६ ऑगस्ट पासून मोफत प्रवासाला सुरुवात झाली होती. एसटी महामंडळाने या योजनेला 'अमृतज्येष्ठ नागरिक' हे नाव दिले असून या योजनेतंर्गत ज्येष्ठ नागरिकांना महाराष्ट्राच्या हद्दीपर्यंत कुठेही मोफत प्रवास करता येणार आहे. या योजनेचा शुभारंभ झाल्यानंतर २६ ऑगस्ट २०२२ ते २६ सप्टेंबर २०२२ दरम्यान राज्यभरातून ५४ लाख ५८ हजारांहून अधिक म्हणजे दररोज सरासरी १ लाख ७५ हजार ज्येष्ठ नागरिकांनी एसटीतून मोफत प्रवासाचा लाभ घेतला आहे.

# धुळ्यातील काही शाळांत निकृष्ट धान्याचे वाटप



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यात प्राथमिक व माध्यमिक शाळेत आर्थिक मागास घटकातील मुलांना मध्यान भोजन योजनेअंतर्गत कडधान्य वाटप केले जात आहे परंतु या धान्याचा दर्जा अत्यंत निष्कृष्ट आणि घाणेरड्या प्रकारे वाटप करण्यात येत आहे. हे धान्य पशु आहार म्हणून वापरण्याचा देखील लायकीची नाही. साक्री रोड वरील एका प्राथमिक या अनुदानित शाळेत आलेले धान्य किती घाणेरड्या दर्जाचे आहेत व कशाप्रकारे वाटप केले जाते याचा प्रत्यय नुकताच आला आहे या शाळेत शिकणाऱ्या शेकडो मुलांच्या जीवाशीही संस्था खेळत आहे याचबरोबर मागास घटकातील कुटुंबातील विद्यार्थ्यांना इतक्या घाणेरड्या प्रकारे कडधान्य पुरवून शासन आणि संबंधित संस्था या गरजू लोकांशी काय मजाक मस्करी करत आहे का...? हे धान्य पुरवठा करणाऱ्या संबंधित घटकांवर आणि धान्य स्वीकारणाऱ्या संस्थेवर कायदेशीर कारवाई करायला हवी अशी कित्येक पालकांची मागणी आहे. बहुतां सरकारी योजना प्रमाणेच या योजनेला ही भ्रष्टाचाराची कीड लागलीच. अधिकारी आणि शाळा कर्मचाऱ्यांनी संगणमताने धान्य विकण्याचे अन्यधान्य शिक्षकांनीच हडप करण्याचे प्रकार काही शाळात धन्य मोजण्याचे माप ही चुकीचे व बोगस पटसंख्या दाखवून या बोगस विद्यार्थ्यांच्या वाटेचे धान्य कर्मचारी वर्गाने गट्टम केले. अशाप्रकारे या भ्रष्टाचाराचे सत्र कधी बंद होईल व गोरगरिबांना न्याय कधी मिळेल अशा प्रकारे सामान्य नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण होत असतात.




## गेहलोत यांची माघार



आधुनिक केसरी

**राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदावरुन काँग्रेस आमदारांनी केलेल्या बंडानंतर मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी आज दिल्लीत काँग्रेसच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांची भेट घेतली. या भेटीनंतर काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक लढणार नसल्याचे गेहलोत यांनी स्पष्ट केले आहे. राजस्थानमध्ये निर्माण झालेल्या राजकीय संकटाबाबत सोनिया गांधींची माफी मागितल्याचे गेहलोत यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले आहे. राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदावर कायम राहणार की नाही, याबाबतचा निर्णय पक्षाध्यक्ष सोनिया गांधी घेतील, असे गेहलोत यांनी म्हटले आहे. मी काँग्रेसमध्ये एका प्रामाणिक सैनिकाप्रमाणे काम करत आहे. पक्ष नेतृत्वाने विश्वास दाखवून आजपर्यंत अनेक जबाबदाऱ्या दिल्या आहेत. काँग्रेस पक्षाचा एका ओळीचा प्रस्ताव मी पारित करू शकलो नाही, याचे दुःख मला आयुष्यभर असेल. राजस्थानमध्ये घडलेल्या प्रकाराची मुख्यमंत्री म्हणून नैतिक जबाबदारी घेत मी सोनिया गांधींची माफी मागितली आहे", असे गेहलोत यांनी स्पष्ट केले आहे. काँग्रेस अध्यक्षपदासाठी अशोक गेहलोत यांच्या नावाला काँग्रेस नेतृत्वाची सर्वाधिक पसंती होती. मात्र, आता या शर्यतीतून गेहलोत यांनी माघार घेतली आहे. दरम्यान, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणूक रिंगणात उतरले आहेत. ते शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. काँग्रेस अध्यक्षपदासाठी दिग्विजय सिंह विरुद्ध शशी थरुर आमनेसामने येणार आहेत. काँग्रेसच्या अधिसूचनेनुसार, निवडणूक अर्ज भरण्याची प्रक्रिया ३० सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. उमेदवारी अर्ज छाननीची तारीख १ ऑक्टोबर, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ८ ऑक्टोबर आहे. उमेदवारांची अंतिम यादी ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता प्रसिद्ध केली जाणार आहे. बिनविरोध निवडणूक न झाल्यास १७ ऑक्टोबरला मतदान होणार असून १९ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. याच दिवशी निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाणार आहे.**

## तेरणा मांजरेची गणमुख्या - कुलस्वामिनी तुळजा



नितीन सावंत
संपर्क क्र. 9970744142

आधुनिक केसरी

**जगभरातील स्थिरस्थावर मानवी सभ्यतेची सुरुवात स्त्रीयांपासुन होते.गरोदरपणात भटक्यांच्या टोळीतील स्त्रीया लांब आणि जास्त प्रवास करु शकत नसत.त्यातून त्यांनी पाण्याच्या , जलाशयाच्या आसर्याने नैसर्गिक गुफा आणि झाडांच्या मोठ्या खोडात रहाणे पसंत केले.या प्रारंभिक स्थिर होण्यातून पुढे शेती , नृत्य , रेखाटन , रंगरंगोट्यांचा शोध स्त्रीयांनी लावला. सुरुवातीला संपूर्ण गण एकत्र रहायचा.पुढे गणातून ज्ञाती फुटुन वेगळ्या बनल्या.ज्ञातींची कुळे झाली आणि नंतर कुळाचे कुटुंब बनत गेले. आशीच महाराष्ट्रातील अनेक कुटुंबे आणि कुळांची पुर्वजा म्हणजे तुळजाभवानी होय.**

तुळा म्हणजे तोलने,मोजने,मापणे किंवा वाटुन देने होय.तुळजा म्हणजे मोजुन देनारी , समान वाटुन देनारी ,तुळा करणारी होय. तेरणा मांजरेच्या किनाऱ्यावर आपल्या वाढत जाणाऱ्या गणाला पोसण्यासाठी जमीन वाटून देनारी. तसेच सामूहिक गणाने काढलेल्या पिकाचे परडीने समसमान हिस्यांत गणात वाटप करणारी गणमुख्या म्हणजे तुळजाई होय.आजच्या भौगोलिक प्रदेशात बालाघाट डोंगर रांगामध्ये समुद्र सपाटीपासून २७० फुट उंचीवर वसलेले गाव म्हणजे तुळजापूर होय . उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुक्याचे हे ठिकाण.धर्मग्रंथात दंडकारण्य म्हणून या भागाचा उल्लेख सापडतो. पुढे तिने वाढत गेलेला गण आपल्या चार ज्ञातींना विभागून दिला. एका ज्ञातिच्या वाट्याला २४ कुळे आली.या चौघींची २४ कुळे मिळुन संख्या बनली ९६ कुळांची.म्हणून महाराष्ट्राची ९६ कुळे वसवणारी आद्य गणराज्ञी म्हणजे तुळजा भवानी होय. परंतू हा काळ वंशसमाजाचा. येथे अजुन जातीव्यवस्था जन्माला आलेली नाही.त्यामुळे ही कुळे एकजातीय नाहीत. आजच्या जातीव्यस्थेत दाखवली जानारी कुळे वंशसमातील कुळांची कॉपी किंवा भ्रष्ट स्वरुप आहे.आज कुनाचेही कुळ शुद्ध उरलेले नाही. तुळजेचा काळ हा शिल्पकलेचा शोध लागण्याच्या आधिचा. त्यामुळे तिचे मुख्य प्रतिक आकारहीन दगडाचे.तुळजापूरची घाटशिळा हेच खरे तिचे स्मृतीस्थळ.पुढे मुर्तीकलेच्या शोधानंतर तुळाजाईमुर्ती स्वरुपात आली. आजही सर्व ग्रामदेवता आकारहीन दगडातच आहेत. ब्राम्हणी छावणीच्या उन्मादा नंतर अनेक पुर्वजांचे , ग्राम संरक्षक मातृकांचे मानवी स्वरूप लपवून त्यांना पुढे अलौकिक दैवत्व बहाल केले गेले आहे. या प्रकारात एक तर त्यांच्याबद्दल दुष्ट आफवा परवल्या गेल्या किंवा अलौकिकत्व देवुन त्यांचे सुष्ट नेनीवेकरन करण्यात आले आहे. मराठीतल्या रंडकी चंडकी ह्या शिव्या रंडी चंडी स्त्रीयांच्यावरुन निर्माण झालेल्या आहेत.कुलटा म्हणजे या गणातून त्या गणात व्यापार व्यवहार औषधउपचार करण्यासाठी फिरनारी राज्ञी होय.आज कुलटा शब्दाला वाईट अर्थ निर्माण करुन दिला गेला आहे.गणीका म्हणजे नाचनारी नव्हे.गणाची प्रमुख ती गणीका.



आशा अनेक शब्दांच्या द्वारे पितृसत्ताक समाज व्यवस्थेत स्त्रीयांची टिंगल टवाळी केली गेलेली आहे.साज घडीला सर्वाधिक शिव्या स्त्रीयांवरुनच आहेत.शिवी सुद्धा शिवाच्या बायकोचे नाव आहे. अगदी याच प्रमाणे आज तुळजाभवानीचा पट जुगाराचा पट म्हणून सांगितला जातो. तुळजाभवानी भारती बुवांच्या मठात जुगार खेळायला जाते अशाप्रकारे भाविकांत एक मिथक पसरवण्यात आलेले आहे.जे चुक आहे. तुळजाभवानीचा चौपट हा गणभुमीचे समान वाटप करनारा पट आहे. म्हणून वंशसमाजात आधी गण त्यांची मुख्या गणराज्ञी मग ज्ञाती होय. पुढे ज्ञातीची कुले बनली.त्यानंतर कुलांची कुटुंब बनत आणि एक कुटुंब काही मैलांवर जावून नवे गाव वसवी. त्यामुळे अनेक नदीकिनारी समान आडनावाची अनेक गावे सापडतात.ज्यांचे देवक कुलचिन्ह एक असल्यामुळे त्यांच्यात विवाह होत नाहीत. हि झाली भाऊबंदकी. जाती समाजात आज कुटुंबव्यवस्था परार्थीकरणातून परात्म बनत चालेली आहे.त्यामुळे एक व्यवस्था जाऊन नवी व्यवस्था येने अपरिहार्यच आहे.तुळजाईच्या विविध ज्ञाती पुढे अनेक नदीकिनाऱ्यावर शेतीयोग्य जमीन शोधत नवे गावे वसत गेल्याचे असल्याला दिसून येते.गावे वसवताना तिच्या गणाच्या , ज्ञातिच्या वंशजांनी आपल्या पुर्वजा भवानीचे ठाणे जागोजागी उभे केले.तिचा इतिहास विविध मार्गाने जपून ठेवला. असेच देवीचा इतिहास जपून ठेवनारे गोंधळी , आराधी , भोपे , पोतराज,तृतीय पंथी होत. मानव समाज वंशसमाजात शिकारीतून शेतीत उतरला आणि त्यांच्यात आधी गण तयार झाले. मग गणाचे ज्ञातीत विभाजन झाले. त्यानंतर, प्रत्येक ज्ञातींत कुले बनत गेले. पुढे सात पिढ्यांच्या नंतर कुले विभाजीत होत. नवे कुल तयार होत असे. साळंतून व सरंजामी समाजात आल्यावर कुळाची जागा कुटुंबाने घेतली. कुटुंबातून पुढे भाऊकी.भावकी आणि वाडे यांची संख्या सात पिढ्याइतके वाढली की बेट फुटून ११ मैलावर नवा गाव वसवला जाई. या वंशसमाजातील सा-लोहित अर्थात रक्तसंबधाने बांधलेल्यांत विवाह होत नाहीत. त्यासाठी कुलचिन्ह देवक परंपरा होती. ज्यांचे देवक कुलचिन्ह सेम ते भाऊबंद मानले जातात.पुढे जाती समाजात आडनावेही आली.समान आडनावे असनारे भाऊबंद मानले जावुन तिथेही बेटीव्यवहार होत नाहीत.ते भाऊबंद असल्यामुळे त्यांच्यात राम राम घालत नाहीत.गावे कसे वसतात किंवा वसवली गेलीत त्याचे एक उदाहरण पाहुया : परभणी हिंगोली जिल्ह्यांच्या सिमा #पुर्णा_ दुधना नद्यांनी बांधलेल्या आहेत. यातील दुधना नदीकिनारी धार, समसापुर, दुरडी आणि मुरुंबा या चार गावी चोपडे आडनावाचे सकुल्य पण असपिंड्य बांधव आहेत. चारही गावी पोळ्याचा मान चोपडे यांच्याकडे आहे. चारही गावी होळीचा मान चोपडे यांच्याकडे आहे.मुख्य गढी आणि वहितीखाली जास्त जमीन चोपड्यांकडेच.ही गावे चोपडेंनी वसवल्याचे लक्षात येते. समसमान वाटणी करनारे गाव समसापुर, नदिच्या अगदीच धारेत ( कडेवर ) वसवलेले गाव म्हणजे धार, नदिने वळण घेतल्यानंतर त्या दुरडीच्या आकाराच्या किनाऱ्यावर वसवलेले गाव दुरडी तर आंबेचे ठाणे असलेले मुरुंबा. अंब शब्द पाण्याशी सुद्धा नाते सांगणारा आहे. ही एकाच भावबंदकीची वा कूळाची आपत्ये आहेत. महापूर आल्याने किंवा गणाची संख्या वाढल्यामुळे नवीन गावे वसवून नवी जमीन वहितीखाली आणण्याचे काम चोपडेंनी केलेले आहे. यासाठी पांढरीच्या जमीत धान्य पुरुन ठेवून कोंभ नाही आले तर ती जमीन गाव वसवण्यासाठीची असे मानले जाते . काळीची सुपीक जमीन पिकांसाठी तिथे गाव वसवणे निषिद्ध. पुर्णा नदिच्या किनारी तर दोन दोन नावांची सारखी गावे आहेत.म्हणजे एकच गाव महापुरात तुटून वेगळा झाला असेल तर नाव कायम राहिले गावे वस्त्या दोन झाल्या.जसे पोटा ही गावे दोन आहेत. परळी (काळे आणि दशरथे) पिंपळगाव (कुटे आणि टोंग) सावंगी (पंढरकर आणि गरुड ),नांदगाव ( जवंजाळ आणि भालेराव ) ही एकाच नावाची दोन गावे आहेत.ही गावे नदिच्या परस्पर विरोधी तिरावर एकमेकांडे तोंडे करुन उभी आहेत.मटकर्हाळा आणि सावंगी या गावी गरुड आडनाची सकुल्य म्हणजे एकाच कुळाची बांधव आहेत. या गावांचा अधिक विस्ताराने अभ्यास केला तर गावे कोण्या काळात वसवली गेलीत, हे सहज लक्षात येइल. यांना एककूळी गावे म्हटले जाते.

## जुबली स्टार आशा पारेख!



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**हिंदी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ अभिनेत्री आशा पारेख याना यावर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार असून हिंदी चित्रपट सृष्टीचा नावलौकिक वाढवण्यासाठी ज्यांनी अतुलनीय काम केले अशा महान कलाकाराला हा पुरस्कार दिला जातो. आशा पारेख यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने एका योग्य कलाकाराला हा पुरस्कार मिळाल्याची भावना चित्रपट रसिकांमध्ये निर्माण झाली आहे कारण आशा पारेख या हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वाधिक यशस्वी कलाकारांपैकी एक आहेत.**

विशेषतः १९५९ ते १९७५ या काळात त्यांनी अनेक यशस्वी चित्रपट दिले. सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासोबत त्यांनी अनेक हिट चित्रपट दिले. १९७१ साली आलेल्या कटी पंतग या चित्रपटाने तर इतिहास रचला. त्यावर्षीचा तो सर्वाधिक गाजलेला चित्रपट होता. या चित्रपटातील त्यांच्या अभिनयासाठी त्यांना फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला होता. १९५९ साली आलेल्या दिल देके देखो या चित्रपटाद्वारे चित्रपट सृष्टीत प्रवेश केलेल्या आशा पारेख यांचा जन्म २ ऑक्टोबर १९४२ रोजी गुजरात मधील महुआ या गावात झाला. त्यांचे वडील हिंदू तर आई मुस्लिम होत्या. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या आशाजींनी वयाच्या दहाव्या वर्षी एका चित्रपटात बाल कलाकार म्हणून भूमिका केली. आशा पारेख या लहान असताना स्टेज शो मध्ये भाग घेत. अशाच एका स्टेज शो मध्ये अभिनय करताना बिमल रॉय या त्या काळातील प्रसिद्ध दिग्दर्शकांनी त्यांना पाहिले त्यांच्या अभिनयाने त्यांना प्रभावित केले आणि त्यांनी आशा पारेख यांना बाप बेटी या चित्रपटात भूमिका दिली. अर्थात ही भूमिका नायिकेची नसली तरी या भूमिकेसाठी त्यांनी जी मेहनत घेतली ती पाहून अनेक निर्माते



दिग्दर्शकांनी त्यांना त्यांच्या चित्रपटात भूमिका करण्यासाठी गळ घातली मात्र त्यांनी मोजक्याच पण दर्जेदार भूमिका असलेल्या चित्रपटात काम केले. त्यांच्या सर्व भूमिका प्रेक्षकांना पसंत पडल्या. त्यांनी नायिका म्हणून भूमिका केलेले जब प्यार किसीसे होता है, घराना, छाया, फिर वही दिल लाया हु, जिद्दी, मेरे सनम, तिसरी मंजिल, लव इन टोकियो, आये दिन बहार के, उपकार, महल, कन्यादान, आया सावन झुमके, आन मिलो सजना, नया रास्ता, कटी पंतग, मेरा गाव मेरा देश, राखी, आंदोलन हे चित्रपट खूप लोकप्रिय झाले. या चित्रपटातील त्यांच्या भूमिकांना प्रेक्षकांनी दाद दिली. यातील काही चित्रपट ५० आठवड्यांपर्यंत चालले म्हणून प्रेक्षक त्यांना जुबली स्टार असे संबोधू लागले. राजेश खन्ना यांच्यासोबत त्यांचे अनेक चित्रपट असले तरी शम्मी कपूर, शशी कपूर, देवानंद, अशोक कुमार, सुनील दत्त, राजेंद्र कुमार यांच्यासोबतही त्यांनी काम केले. त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाले आहे. त्यांच्या अभिनय कलेची दखल घेऊन १९९२ सालीच भारत सरकारने त्यांना पद्मश्री देऊन गौरविले. आता दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या कलेचे खऱ्या अर्थाने चीज झाले असे म्हणावे लागेल. या पुरस्काराबद्दल आशा पारेख यांचे मनापासून अभिनंदन!

## देवीच्या मूर्तीवर कुंकुमार्चन कसे करावे ?

आधुनिक केसरी

देवीच्या उपासनेतील 'कुंकुमार्चन' हा एक विशेष उपासनाप्रकार होय. देवीचा नामजप करत एकेक चिमूटभर कुंकू देवीच्या चरणांपासून वहायला आरंभ करून देवीच्या डोक्यापर्यंत वहात येणे अथवा देवीला कुंकवाने स्नान घालणे म्हणजे 'कुंकुमार्चन'. कुंकू हे शक्तीरूपी आहे, म्हणजेच कुंकवामध्ये देवीतत्त्व ग्रहण करण्याची क्षमता अधिक आहे. याच कारणाने देवीला 'कुंकुमार्चन' केल्यावर देवीच्या मूर्तीतील शक्तीतत्त्व कुंकवामध्ये येते. नंतर ते कुंकू आपण आपल्याला लावल्यावर त्यातील देवीची शक्ती आपल्याला मिळते.देवीला कुंकुमार्चन करण्याच्या दोन पद्धती पाहूया.

अ. पद्धत 1 : 'देवीचा नामजप करत एक-एक चिमूटभर कुंकू देवीच्या चरणांपासून प्रारंभ करून तिच्या डोक्यापर्यंत वहावे अथवा देवीचा नामजप करत तिला कुंकवाने स्नान घालावे. काही ठिकाणी कुंकुमार्चनात कुंकू केवळ चरणांवर वाहतात.'

आ. पद्धत 2 : काही ठिकाणी देवीला कुंकुमार्चन करतांना कुंकू केवळ चरणांवर वाहिले जाते. 2. शास्त्र : 'मूळ कार्यरत शक्तीतत्त्वाची निर्मिती ही लाल रंगाच्या प्रकाशातून झाली आहे. शक्तीतत्त्वाचे दर्शक म्हणून देवीची पूजा कुंकवाने करतात. कुंकवातून प्रक्षेपित होणाऱ्या गंधलहरींच्या सुवासाकडे ब्रह्मांडातील शक्तीतत्त्वाच्या लहरी अल्प कालावधीत आकृष्ट होत असल्याने मूर्तीतील सगुण तत्त्वाला जागृत करण्यासाठी लाल रंगाचे दर्शक, तसेच देवीतत्त्वाला



प्रसन्न करणाऱ्या गंधलहरींचे प्रतीक म्हणून कुंकवाच्या उपचाराला देवीपूजेत अग्रगण्य स्थान दिले आहे. मूळ शक्तीतत्त्वाच्या बिजाचा गंध हाही कुंकवातून दरवळणाऱ्या सुवासाशी साधर्म्य दर्शवणारा असल्याने देवीला जागृत करण्यासाठी कुंकवाचे प्रभावी माध्यम वापरले जाते.

कुंकवात शक्तीतत्त्व आकृष्ट करण्याची क्षमता जास्त असते; म्हणून देवीच्या मूर्तीला कुंकुमार्चन केल्यावर ती जागृत होते. जागृत मूर्तीतील शक्तीतत्त्व कुंकवात येते. नंतर ते कुंकू आपण लावल्यावर त्यातील देवीची शक्ती आपल्याला मिळते. यासंबंधी अधिक माहिती सनातन संस्थेचा लघुग्रंथ 'देवीपूजनाशी संबंधित कृतींचे शास्त्र', यात मिळेल. या

**संकलन- दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था, संपर्क- 9284027180**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# लोकसंख्या धोरण आणि सुशासन




मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**लोकसंख्या आणि सुशासन यांचा जवळचा संबंध आहे. सुशासन ही एक लोकप्रिय संकल्पना आहे, ज्यामध्ये जनतेची चिंता केंद्रस्थानी आहे. गांधींचा सर्वोदय त्याच्या गर्भित अर्थाने पाहता येईल.सुशासन हे सार्वजनिक सबलीकरणाचे लक्षण आहे, तर लोकसंख्येचा विस्फोट हे सर्वसमावेशक विकासाचे आव्हान आहे.लोकसंख्येच्या प्रमाणात सुशासन असायला हवे.त्याच वेळी, सर्वसमावेशक विकासाची चौकट आणि शाश्वत विकासाची प्रक्रिया अशा स्वरूपाची असावी की समाज आदर्श नसला तरी व्यावहारिकदृष्ट्या सुव्यवस्थित आणि चांगले जगण्यास सक्षम असेल.या व्यवस्थेसाठी लोकसंख्या धोरण हा एक प्रभावी उपाय ठरू शकतो. त्याच्या गंभीर पैलूंवर नजर टाकली, तर भारतातील लोकसंख्याशास्त्रीय संक्रमण दुसऱ्या टप्प्यात आहे.**

एकीकडे आरोग्य सुविधांच्या विकेंद्रीकरणामुळे मृत्यूदर कमी झाला आहे, तर दुसरीकडे जन्मदरात अपेक्षित घट आणण्यात यश आलेले नाही.जगातील दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या असलेला भारत लवकरच चीनला मागे टाकेल, असे हे लक्षण आहे. वर्ल्ड पॉप्युलेशन प्रॉस्पेक्ट रिपोर्ट 2022 मध्येही ते प्रकाशित झाले आहे.असा अंदाज आहे की 2022 च्या अखेरीस चीन आणि भारताची लोकसंख्या जवळपास समान असेल आणि 2023 मध्ये भारत लोकसंख्येच्या बाबतीत चीनला मागे टाकेल. 15 नोव्हेंबर 2022 पर्यंत जगाची लोकसंख्या आठ अब्ज, 2030 पर्यंत साडेआठ अब्ज आणि 2050 पर्यंत 9.7 अब्जांपर्यंत पोहोचेल, असेही आकडेवारीवरून दिसून येते.संसाधनांच्या बाबतीत, पृथ्वी कदाचित दहा अब्ज लोकसंख्येला पोषण आणि अन्न पुरवू शकते. लोकसंख्या नियंत्रणाबाबत अजूनही अंतर राखले गेले, तर जीवसृष्टीला मोठे धोके उभे राहतील, असा इशारा वरील आकडेवारीतून देण्यात आला आहे.



भारतातील लोकसंख्या धोरणावर काम स्वातंत्र्यानंतरच सुरू झाले होते, परंतु त्याचा प्रश्न म्हणून विचार न केल्यामुळे त्याकडे लक्ष दिले गेले नाही. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत लोकसंख्येची झपाट्याने वाढ जाणवली. चौथ्या पंचवार्षिक योजनेत लोकसंख्या धोरणाला प्राधान्य देण्यात आले. शेवटी पाचव्या योजनेत आणीबाणीच्या काळात राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहीर करण्यात आले. पण त्या काळासाठी ते अधिक दबावाचे होते. लोकसंख्या नियंत्रणासाठी सक्तीचे नसबंदी कायदा करण्याचे अधिकार देण्यात आले. त्यामुळे सरकार पडल्यानंतर या धोरणाचे विघटन झाले. 1977 मध्ये पहिले बिगर काँग्रेस सरकार आले तेव्हा पुन्हा नवीन लोकसंख्या धोरण आले. जुन्यापासून धडा घेत स्वेच्छा तत्त्वाला महत्त्व दिले गेले, सक्ती दूर केली आणि कुटुंब नियोजनाऐवजी त्याला कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे स्वरूप देण्यात आले. साहजिकच याचा काही विशेष परिणाम झाला नाही. राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात जून 1981 मध्ये सुधारणा करण्यात आली. पण देशाची लोकसंख्या वाढतच गेली. 1951 मध्ये भारताची लोकसंख्या छत्तीस कोटी होती आणि 2001 पर्यंत हा आकडा एक अब्जाच्या पुढे गेला होता. लोकसंख्या नियंत्रणासाठी जे धोरण आखले गेले होते, त्याची जोरदार सुरुवात व्हायला हवी होती, पण तसे काही घडले नाही.

लोकसंख्येचा स्फोट अनेक समस्यांना जन्म देतो. यामुळे बेरोजगारी, अन्नाची समस्या, कुपोषण, कमी दरडोई उत्पन्न, गरिबीत वाढ, महागाई वाढणे या गोष्टी स्वाभाविक आहेत. त्याचबरोबर शेतीवरील वाढता भार, बचत आणि भांडवल निर्मितीत घट, गुन्हेगारीत वाढ, स्थलांतर आणि शहरी दबाव वाढणे या समस्या निर्माण होणे स्वाभाविक आहे. वाढती लोकसंख्या अनेक समस्यांना वाट मोकळी करून देत असेल, तर सुशासनाचा उष्माही थंडावू शकतो, जो सत्ता आणि जनतेच्या हिताचा अजिबात नाही. वाढती लोकसंख्या लक्षात घेता, फेब्रुवारी 2000 मध्ये नवीन लोकसंख्या धोरण जाहीर करण्यात आले, ज्यामध्ये जीवनमानाच्या गुणात्मक सुधारणासाठी तीन उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. असे असूनही, 2011 च्या जनगणनेतील प्रत्येक चौथा व्यक्ती निरक्षर होता आणि तितक्याच लोकांची नोंद दारिद्र्यरेषेखालील करण्यात आली होती.

भारतात लोकसंख्या धोरणाबाबत नैतिक सुधारणा होत असतील, तर त्याला लोकसंख्या नियंत्रणाऐवजी गुणवत्ता सुधारणा म्हणता येईल. दुसरे म्हणजे कुटुंब नियोजनाबाबत सरकार खरोखरच गंभीर आहे का? पाणी आधीच डोक्यावरून गेले आहे. भारताचे लोकसंख्या धोरण हा आता फक्त साधा मुद्दा राहिलेला नाही, तर तो धर्म आणि पंथात अडकलेला दृष्टिकोनही बनला आहे. लोकसंख्या नियंत्रणासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती, ज्यामध्ये केंद्र सरकारला या दिशेने पावले उचलण्याचे निर्देश द्यावेत. लोकसंख्येचा स्फोट हे देशातील गुन्हेगारी, प्रदूषण आणि संसाधने आणि नोकऱ्यांमध्ये होणारी घट याचे मूळ कारण असल्याचे अपिलात म्हटले आहे. अशा समस्यांमुळे सुशासनासाठी आव्हाने निर्माण होतात. भारत हा जगातील पहिला देश आहे ज्याने 1952 मध्ये प्रथम कुटुंब नियोजन स्वीकारले. असे असूनही, आज ती जगातील सर्वात मोठी लोकसंख्या बनणार आहे. चीनची चर्चा इथे अपरिहार्य आहे. चीनमध्ये 1979 मध्ये एक मूल धोरण लागू करण्यात आले. तीन दशकांनंतर, एक मूल धोरणाचा पुनर्विचार करावा लागला. मात्र, तरुणांची संख्या कमी होऊन वृद्धांची संख्या वाढली. त्यामुळे भारतात सध्या लोकसंख्या नियंत्रण कायद्याची गरज नाही, असे अनेकांचे मत आहे.

लोकसंख्येचा स्फोट आणि लोकसंख्या नियंत्रणाची गरज अनेक धोरणकर्त्यांचा गैरसमज आहे. 2021 मध्ये, उत्तर प्रदेश सरकारने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त 2021-30 साठी नवीन लोकसंख्या धोरण जारी केले, ज्यामध्ये प्रजनन दर 2026 पर्यंत 2.1 प्रति हजार लोकसंख्येवर आणि 2030 पर्यंत 1.9 पर्यंत आणण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. सध्या तरी भारतातील सर्वात मोठे राज्य असलेल्या उत्तर प्रदेशमध्ये सध्याचा प्रजनन दर 2.7 टक्के आहे. आकड्यांचे वास्तवात रूपांतर करण्यासाठी केवळ कागदोपत्री काम करून चालणार नाही. दोन अपत्य धोरणाबाबत भारतातही चर्चा जोरात सुरू आहे, पण त्यासाठी ठोस पावले उचलली गेली नाहीत. तथापि, आसामने 2021 मध्ये दोन अपत्य धोरण स्वीकारण्याचा निर्णय घेतला होता. अनेक राज्यांमध्ये पंचायत निवडणूक लढवण्यासाठी अशी पात्रता विहित केलेली आहे. सरकारी नोकरीसाठीही अशी पात्रता ठेवण्यात आली आहे. संसाधने आणि सुशासन यांचाही जवळचा संबंध आहे. वाढत्या लोकसंख्येसाठी संसाधने वाढवणे ही सुशासनाचीही जबाबदारी आहे. राष्ट्राची लोकसंख्या आणि साधनसंपत्ती यांचा जवळचा संबंध असतो. भारतातील अन्न सामग्रीबाबतची आव्हाने कमी झाली आहेत, पण संपलेली नाहीत. वास्तविक, देशाच्या समस्यांचे मूळ लोकसंख्येचा विस्फोट मानले जाते. भारताचे क्षेत्रफळ जगाच्या क्षेत्रफळाच्या केवळ 2.4 टक्के आहे आणि लोकसंख्या अठरा टक्के आहे. दक्षिण भारतातील बहुतांश राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणावर कौतुकास्पद काम केले आहे. केरळ, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात सर्वाधिक घट झाली आहे, तर उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, हरियाणा इत्यादी राज्यांमध्ये लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. 'छोटे कुटुंब, सुखी कुटुंब' ही संकल्पना अनेक दशके जुनी आहे, पण लोक हे सूत्र अंगीकारण्यात खूप मागे आहेत. लहान कुटुंब, उत्तम संगोपन आणि वातावरण प्रदान करते आणि सर्वांसाठी आनंद आणि शांतीचा मार्ग मोकळा करते. अशा परिस्थितीत देशात दोन अपत्य धोरण किंवा लोकसंख्या नियंत्रणाचे कोणतेही ठोस उपाय नसले तरीही देशातील नागरिकांच्या अर्थपूर्ण सहकार्याने सुखी कुटुंब आणि सशक्त देश ही संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणता येते.

# आई राजा उदो उदो जगत् जननीचा उदयोस्तु

आधुनिक केसरी

**आई अंबिकेची भरते, खणा नारळाने ओटी, देते हिरवा चुडा करी, हिरवी पैठणी जरीकाठी. अश्विन महिन्यात येणारा आदिशक्तीचा नवरात्रोत्सव आपण साजरा करत आहोत.या सुरू असलेल्या जगदंबा नवरात्र महोत्सवात यंदा पाचव्या दिवशी म्हणजेच पाचव्या माळेला हिरव्या रंगाच्या साजाचा आदिमातेला श्रृंगार चढवला जाणार आहे.**

म्हणजे या काळात येणारे सगळे भक्त आई जगदंबेला हिरवा चुडा, हिरवीगार साडी सर्वजण मनोभावे अर्पण करतात. पण हिरव्या रंगाला येवढे का महत्त्व दिले जाते हे मात्र पहाण्याची तसदी फार थोडेजण घेतात.कुणाला विचारलं तर सौभाग्याच लेणं आहे म्हणून हिरव्या रंगाला महत्त्व आहे असे उत्तर मिळते.पण आपण मला एक सांगा ह्या उत्तराने आपलं खरंच समाधान होतं? नाही ना... तर आज आपण त्या विषयी थोडं माहिती करून घेऊया.

हिरवा रंग हा नव निर्मितीच प्रतिक मानला जातो. धरणीच्या कुशीतून रुजलेल्या बीयाणातून कोंब फुटून वर येतो तो हिरवा असतो.ग्रिष्माच्या झळा सोसून पानगळ झाली तर बघवत नाही पण वर्षा ऋतूच्या आगमनाने हिरवीगार झालेली वसुंधरा मनाला भुरळ घालते,सुखावते. कारण जुनी मरगळ जाऊन नवनिर्मिती झालेली असते.

आपल्याकडे त्याच कारणाने मुलगी मोठी,कळती झाली की तिची हिरवी साडी, हिरव्या बांगड्या देऊन ओटी भरतात.पुर्वी मुलींचे विवाह लवकर होत होते आणि म्हणून मुलीला नहाण आलं म्हणजे ती पूर्ण स्त्री झाली वंशवृध्दी करण्यास सक्षम झाली. म्हणून या वेळी हिरव्या रंगाला महत्त्व दिलं जाते. लग्नविधीत फलशोभन या धार्मिक विधीलाही तेवढेच महत्त्व दिले जाते.दोन जीवांचे मधुर मिलन होऊन त्या रात्री पासून गृहस्थाश्रमातील गोड पर्वाची मुहुर्तमेढ रोवली जाते. यावेळी सुध्दा वधूला



हिरवा साज चढवून शृंगार केला जातो. जेंव्हा स्त्री गर्भवती असते तेंव्हा तीला हिरवी साडी, हिरव्या बांगड्या भरुन चोळी घातली जाते,डोहाळेजेवण केले जाते.नव निर्मितीचे प्रतिकात्मक म्हणून हिरव्या रंगाकडे पाहिले जाते.

या शिवाय हिरवा रंग हा शांततेच प्रतिक मानला जातो म्हणून त्याला आपल्या भारताच्या तिरंगा ध्वजात स्थान आहे, मान आहे. हिरवा रंग हे सौभाग्याच लेण आहे म्हणून विधवा स्त्रीने हिरवे वस्त्र परिधान करायचे नाहीत,हातात हिरवा चुडा भरायचा नाही असा नियम आहे,आणि हा नियम घरातले, आजूबाजूचे लोक अगदी काटेकोरपणे तिला पाळायला लावतात.कारण विचारलं तर येवढंच उत्तर मिळत हिरवा रंग सौभाग्याचं लेण आहे म्हणून विधवा स्त्रीने हिरवा रंग वापरणे निशीध्द आहे, आपल्या धर्मशास्त्रात तसेच सांगितले आहे.धर्म शास्त्रात तसे सांगितले आहे हे मलाही माहीत आहे आणि मान्यही आहे. हा घातलेला नियम बरोबरही आहे पण हा नियम का घातला गेला असावा किंवा घातला गेला आहे हा प्रश्न खरंच कुणाला का पडत नाही? खरंच ह्याच्या मुळाशी जाण्याची तसदी कोणीच कसंकाय घेत नाही?

हिरवा रंग नवनिर्मितीचे प्रतीक आहे आणि स्त्री नवनिर्मितीचा स्त्रोत आहे. ही आहे स्त्रीच्या जीवनातील हिरव्या रंगाची महती आणि हे आहे कुठल्याही शुभ कार्यातील स्त्रीच्या जीवनातले हिरव्या रंगाचे महत्त्व.असं मलातरी वाटतं, तुम्हाला काय वाटतं किंवा या पेक्षा दुसरं कोणतं कारणं असेल तर मला जरूर सांगा.

आई राजा उदो उदो बोल भवानी की जय

**©® ज्योती ज.आळंदकर**
**लातूर.**

# दमा हा श्वसनाचा आजार

आधुनिक केसरी



दमा हा श्वसनाचा असा आजार आहे, जो कोणत्याही वयोगटातील व्यक्तीला होऊ शकतो. सध्या वादळी हवामान सुरू आहे, त्याच बरोबर प्रदूषणही शिगेला पोहोचलं आहे ज्याने दमा लगेच सुरू होतो. ह्या रोगात हवेच्या परिणामामुळे रुग्णाच्या श्वसनमार्गामध्ये सूज येते, ज्यामुळे रुग्णाला श्वास घेण्यात त्रास होतो. दम लागण्याच्या कारणांमध्ये धूळ (घर किंवा मैदानी), स्वयंपाकघरातील धूर, ओलावा, ओलसरपणा, हवामानातील बदल, ढगाळ हवा, सर्दी, धूम्रपान, फास्ट फूड, मानसिक चिंता, व्यायाम, पाळीव प्राणी आणि फुलांचे पराग इत्यादी कारणं समाविष्ट आहेत. दमा हा आजार दीर्घकाळ त्रास असल्यामुळे त्याला सातत्यपूर्ण वैद्यकीय देखभालीची आवश्यकता असते. साधा ते तीव्र दमा असलेल्या व्यक्तींनी दीर्घकाळ व दैनंदिन औषधे घेतल्याने दम्याच्या त्रासातून काही प्रमाणात मोकळीक मिळू शकते. दम्याची लक्षणे दिसल्यावर अल्पकालीन औषधांच्या उपाययोजनातूनही त्वरीत आराम पडू शकतो. दम्याचे नियंत्रण फक्त औषधोपचारांनी करता येत नाही. ह्या व्यक्तींनी दम्याच्या त्रासाला सुरुवात करून देणाऱ्या तसेच श्वसनमार्गावर परिणाम करणाऱ्या गोष्टींचा अभ्यास केला पाहिजे. रक्तवाहिन्यांमधील अडथळ्यांच्या रोगांमुळे बळी पडणाऱ्यांसारखे दम्याने मृत्यूमुखी पडण्याचे प्रमाण नसले तरीही औषधोपचार न करणे तसेच दम्याचे गांभीर्य न समजणे यामुळे दम्याने मृत्यू ओढवू शकतो. बऱ्याचवेळा तो रूग्णालयाच्या बाहेरच होतो. जगभरात जवळपास तीस करोड रुग्णांना असणारा दमा हा सर्वात जास्त प्रचलित असा असंसर्गजन्य रोग आहे. हा रोग आता लहान मुलांत ही आढळू लागला आहे. आयुर्वेदात दमाच्या मूळ कारणावर लक्ष देत तो बरा करण्याची सर्वांगीण उपचार पद्धती उपलब्ध आहे. आयुर्वेदानुसार जीवन शैलीत विशिष्ट बदल करीत आयुर्वेदिक उपचार केल्यास दमा आटोक्यात आणला जाऊ शकतो.

# दुर्गा माता सिंहाची स्वारी करते यामागील रहस्य

आधुनिक केसरी

**नवरात्रीच्या नऊ दिवसात दुर्गा देवीच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. प्रत्येक रूपाचे महत्व व कथा आहे. नवरात्रीमध्ये दुर्गा देवीच्या या कथांबद्दल माहिती वाचायला किंवा ऐकायला मिळते. आज याच क्रमात दुर्गा देवीचे वाहन सिंह याबाबत सांगणार आहोत. दुर्गा देवीची नऊ रूपे आहेत व त्यांचे वाहन सुद्धा वेगवेगळे आहे. परंतु सिंह हे देवीचे मुख्य वाहन आहे.**

दुर्गा देवीच्या सिंहावरून स्वारी करण्यामागे अनेक कथा वाचायला मिळतात. यातील सर्वात जास्त प्रचलित कथेनुसार, पार्वतीने भगवान शिवाला पती रुपात मिळवण्यासाठी अनेक वर्षे तपस्या केली. त्या दरम्यान देवीचा रंग सावळा झाला होता. एके दिवशी पार्वती व भगवान शीव कैलास पर्वतावर बसून हास्य-विनोद करत होते. तेव्हा भगवान शीव यांनी पार्वतीला विनोदात काळी म्हंटले. पार्वतीच्या मनाला ही गोष्ट लागली तेव्हा पार्वती कैलास पर्वत सोडून परत तपस्या करण्यात लीन झाली. त्याच वेळी एक भुकेला सिंह पार्वतीला खाण्याच्या इच्छेने तिथे पोहचला परंतु तपस्येत गुंग असलेल्या पार्वतीला पाहून तो शांतपणे बसला. सिंहाने विचार केला की जेव्हा देवी पार्वती तपस्येतून उठेल तेव्हा आपण तिला आपले भक्ष्य बनवूया. या दरम्यान अनेक वर्षे गेली पण सिंह आपल्या जागेवरून काही उठला नाही. तो सुद्धा भुकेलेले-तहानलेला होऊन तिथे बसून राहिला. पार्वतीची तपस्या पूर्ण झाल्यावर भगवान शीव प्रकट झाले व त्यांनी तिला गौरवर्णीय होण्याचा आशीर्वाद दिला. त्यानंतर जेव्हा पार्वती गंगेत स्नानासाठी गेली तेव्हा तिच्या शरीरातून एक सावळी देवी प्रकट झाली तिला कौशिकी म्हंटले गेले आणि गौरवर्णीय झाल्याने पार्वती देवीला महागौरी म्हणून ओळखले जाऊ लागले. पार्वतीने बघितले की, सिंह सुद्धा तिच्यासोबत तहान-भूक त्यागून तपस्या करत होता म्हणून तिने सिंहाला आपले वाहन बनवले. आपले भक्ष्य मिळवण्यासाठी सिंह पार्वती सोबत तपस्या करत होता. देवी पार्वतीने याला सिंहाची तपस्या समजले व त्याला आपल्या सेवेत घेतले. अशाप्रकारे ती आई शेरावाली नावाने ओळखली जाऊ लागली. म्हणूनच दुर्गा देवीचे सिंह व वृषभ असे दोन वाहन मानले जातात. दुसरी कथा स्कंद पुराणात मिळते. त्यानुसार, भगवान शीव व पार्वती यांचा मुलगा कार्तिकेय यांनी देवासुर संग्राम मध्ये दानव तारक आणि त्याचे दोन भाऊ सिंहमुखम व सुरापदमन असुरांचा पराभव केला. सिंहमुखम ने कार्तीकेयची माफी मागितली ज्यावर प्रसन्न होऊन त्याने त्याला सिंह बनवले आणि दुर्गा देवीचे वाहन होण्याचा आशीर्वाद दिला. देवी आपल्या प्रत्येक रुपात वेगवेगळ्या वाहनांवर आरूढ आहे. दुर्गा देवी सिंहावर तर पार्वती वाघावर आरूढ असलेली दिसते. पार्वती पुत्र कार्तिकेयचे एक नाव स्कंद देखील आहे म्हणून पार्वती स्कंद माता म्हणून ओळखली जाते, जिला सिंहावर स्वार दाखवली गेली आहे. तसेच कात्यायनी देवी जिने महिषासुराचा वध केला होता तिचे वाहन सुद्धा सिंह आहे. देवी कुष्मांडा व माता चंद्रघंटा वाघावर स्वार आहे. अष्टमीला ज्या देवीची पूजा केली जाते ती महागौरी वृषभ वाहनावर स्वार असलेली दिसून येते. माता कालरात्री गाढवाची स्वारी करते तर माता सिद्धीदात्री कमळावर आरूढ आहे.



# !! पाटण्याची ..पाटणादेवी. !!



आधुनिक केसरी

पाटणं , पाटण , किंवा पाटणा या नावाने ओळखले जाणारे हे गाव अत्यंत नयनरम्य निसर्गाच्या कुशीत पहुडल्या सारखे आहे. आपण मुंबईकर असाल तर रात्रीच्या दादर अमृतसर एक्सप्रेसने निघून पहाटे चाळीसगावला पोचू शकता. आपण पुणेकर असाल तर रात्री महाराष्ट्र एक्सप्रेसने निघा सकाळीच चाळीसगावला आपण पोहंचात. परतीच्या प्रवासातही याठिकाणहून गाड्या उत्तम आहेत. आपण महाराष्ट्रामधून मराठवाड्यातील कोणत्या मार्गाने बसेसने चाळीसगावला येऊ शकता. चाळीसगावहून अगदी सकाळी साडेसातला पाटणादेवीकडे जाणारी बस मिळेल. ही बस डोंगराच्या त्या निसर्गरम्य वातावरणातून आपणास निसर्ग रम्य वातावरणाचा अनुभव घेत थेट पाटणादेवीच्या मंदिरापर्यंत पोहोचविते .पूर्वी अशी एसटी बस सभा उपलब्ध उपलब्ध नव्हती. आता मात्र सकाळ संध्याकाळ एसटीने बसेसची व्यवस्था केलेली आहे. सातमाळा पर्वतरांगेच्या पायथ्याशी घनदाट अशा निबिड अरण्यात दोन ओढ्यांच्या संगमावर हे मंदिर वसलेलं आहे. मंदिराचे जोते उंच आहे. आपणं उंच पण प्रशस्त पायऱ्या चढून वर येतो. त्यानंतरच आपणा मंदिरात जावे लागते. मोठ्या उंच पायऱ्या चढण्यापूर्वीच आपल्या स्वागतासाठी द्वार रक्षका प्रमाणे याठिकाणी दोन उंच दीपमाळा दिसतात. चोहोबाजूंनी बहरलेली वनश्री... हिरवेगार डोंगर त्या डोंगराच्या कुशीत अत्यंत खोलवर असे हे पाटणादेवीचे प्राचीन मंदिर आहे. देवळाच्या मागून डोंगरकड्यावरून स्वतःला झोकून देणारे पांढरे शुभ्र खळखळणारे धबधबे... पाहणाऱ्याचं मन मोहन टाकतात. अशा गर्द अरण्यात काही हिंस्र श्वापदांचाही वावर आहे असे या ठिकाणचे पुजाऱ्यांनी आम्हाला बोलताना सांगितले. त्यामुळे दिवस मावळतीला जातो तसे लोक गावात परतू लागतात. शांत वातावरणात जंगलातून वाहणाऱ्या वाऱ्यांचाही सुं..सुं..सुं.. आवाज आला की अंगावर शहारे येतात . पूर्वी पाटणादेवी कड्यावर अवघड जागी होती पण कान्हेरा स्वामी नावाच्या भक्तांच्या भक्तीवर प्रसन्न होऊन ती खाली आली अशी आख्यायिका सांगितले जाते. या मंदिराच्या जवळ अत्यंत नावाजलेला केदारकुंड नावाचा एक अतिशय सुंदर धबधबा ही आपणास दिसतो. पाटणा या नावाने ओळखणे जाणारे हे छोटेसे खेडे ..टुमदार गाव.. पण हे गाव खूपच प्राचीन आहे. पाटणा ही निकुंभवंशीय राजाची राजधानी होती. त्यावेळी थोर ज्योतिष भास्कराचार्य नी गणिततज्ञ या ठिकाणी राहून त्यांनी सखोल अभ्यास केलेला होता. येथील एका डोंगराच्या पायथ्याशी अत्यंत रेखीव असे प्राचीन हेमाडपंथी शिवमंदिर आहे. डोंगरात सीता न्हाणी.. नागार्जुन व शृंगार चावडी नावाची कोरीव लेणी पण आहेत. डोंगरावर कान्हेरा किल्ल्याचे अवशेष आपणास दिसतात. दुसऱ्या एका डोंगरावर प्रसिद्ध पितळखोरा लेणी पण आहेत. याच परिसरात खळखळणारे सुरेख धबधबे खूप आहेत. चाळीसगाव पाटण या रस्त्यावर वाल्मिकीच्या तपश्चर्याने पावन झालेले वालझरी नावाचे क्षेत्र देखील आहे. पाटणादेवीच्या या मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी हेमाडपंथी असंख्य खांबावर उभा असलेला कोरीव रेखीव सभा मंडप मनमोहीत करून टाकतो. आपण मंदिरात प्रवेश करतो मी थक्क होऊन जातो .देवीच्या त्या अक्राळविक्राळ रौद्ररूपाकडे आपण पाहून सीमित होऊन जातो. देवीला १८ हात त्यात विविध आयूदन नुकतेच तिने तलवारीने एका राक्षसाचा शिरच्छेद केलाय. त्या मुंडक्यातून अजून रक्त गळते ..अशी मूर्ती आहे.





सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

उत्सव देवीचा



# नवशक्तीचे नऊ रंग



## पाचवा दिवस-रंग हिरवा !



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

अश्विन शुद्ध प्रतिपदा ते नवमी पर्यंत चालणारा उत्सव म्हणजे नवरात्रोत्सव! तसा हा उत्सव दसऱ्यापर्यंत चालतो. नवव्या दिवशी श्री देवींचे विसर्जन आणि दहाव्या दिवशी रावण दहनाने या उत्सवाचा शेवट होतो.

प्रतिपदेला घट स्थापना करून या उत्सवाला प्रारंभ होतो. परंतु, घट म्हणजे काय? घट स्थापना म्हणजे काय? आणि याच नऊ दिवसांत तो संस्थापित का करायचा? या मागे केवळ धार्मिक, सांस्कृतिक किंवा उत्सव एवढाच उद्देश होता किंवा आहे का? असे काही प्रश्न सहजच पडतात आणि मन विविध प्रश्नांचा शोध घेत जातं. या सर्वच प्रश्नांच्या मुळाशी गेल्यानंतर अनेक प्रश्न उलगडायला लागतात. भारतीय सणसमारंभ सहजतेने बरंच काही शिकवून जातात. इथे वर्षभरात एकच नाही तर चार नवरात्रोत्सव साजरे केले जातात! चैत्र प्रतिपदेला एक, आषाढ महिन्यात दुसरी, अश्विन प्रतिपदेला तिसरी आणि माघ महिन्यात चौथी नवरात्र संपन्न होते. हे चारही काल ऋतूबदलाचे संकेत देणारे असून इथली कृषीसंस्कृती ही स्त्रीप्रधान, शरीर-विज्ञानाचा आधार आणि केवळ निसर्ग देवतेचं पूजन करणारी होती हे यावरून सिद्ध होते.

चैत्रात नववर्षारंभ, आषाढात पावसाळा, अश्विनमध्ये पालवी आणि माघ महिन्यात उन्हाळा! मग इतर तीन नवरात्री मोठ्या प्रमाणात का साजऱ्या केल्या जात नसतील? यासाठी पुराणांत आणि विविध ग्रंथात अनेक पुरावे आणि तत्संबंधाने कारणमीमांसा आली आहे, त्याचा उहापोह करायला इथे मर्यादा आहेत. परंतु याचं सरळ कारण इथल्या कृषी संस्कृतीशी निगडीत आहे.

चैत्र, आषाढ आणि माघ हे तीनही महिने शेती-शेतकरी-उत्पन्न आणि वातावरण उत्सव साजरा करण्यास पूरक नसून अश्विन महिन्यात पावसाळा संपून थंडीची चाहूल लागते. शेतकऱ्यांची सुगी हाती आलेली असल्यामुळे चार पैसे खर्च करून सणसमारंभ साजरा करण्याची त्याच्यात कुवत आलेली असते. वर्षभर राबराब राबणारी शेतकऱ्याची सौभाग्यवती घर-शेत काम करून थकली-भागली असते. तीला हे नऊ दिवस उसंत मिळावी, तीने घरातील सर्वांची काळजी घेतांना स्वतःची काळजी घावी. तिला नवनवीन वस्त्रे घेऊन तीचा सन्मान व्हावा! याच उद्देशाने इथल्या कृषीसंस्कृतीने हा अश्विन प्रतिपदेचा उत्सव मोठ्याप्रमाणात साजरा करायचे ठरवले असावे.

नऊ दिवस चालणारा हा नवरात्रोत्सव, आणि नऊ हा आकडासुद्धा अत्यंत महत्वपूर्ण आहे. आईच्या उदरात गर्भ नऊ महिने नऊ दिवस राहतो! सृष्टीला ललामभूत करणारे रंगही नऊच असून याच रंगांनी माणसाला जगण्याची उभारी दिली आहे. हे रंगच माणसांचे संघर्षशील जीवन सुशोभित करतात! त्याचबरोबर नऊ गृह, नऊ रस हे सुद्धा एक वेगळे, सविस्तर चिंतनाचे विषय होऊ शकतात.

आज पंचम दिनी श्रीदेवीचे स्कंदमाता नावाने पूजन केले जाते. स्कंदमाता म्हणजेचे कुमार कार्तिकेयाची माता जे स्कंद म्हणून ओळखले जातात. आज साधकाने शरीरातील विशुद्ध चक्रावर मन एकाग्र करून सिंहासनगता नित्यं पद्माश्रितकरद्वया। शुभदास्तु सदा देवी स्कन्दमाता यशस्विनी॥

हा स्कंदमाता मंत्रोच्चार करून साधना केल्यास दीर्घायुष्य प्राप्ती होते. आज माताहिरव्या रंगांची वस्त्र परिधान करून प्रकटली आहे. हिरवा रंग म्हणजे सौभाग्य, आनंद, समृद्धी, रुजुवात, वाढ, प्रजनन क्षमता, स्वाभिमान, ताजेपणा, एकांत, निसर्गप्रेम, बुद्धिप्रामाण्यवाद, प्रदर्शन-प्रीयता, शीतलता याचे द्योतक आहे. संपूर्ण सृष्टी हिरव्या रंगाने नटते. हा हिरवा रंग म्हणजे तमाम सृष्टीचा भरण-पोषणाचा रंग आहे! नववधू हिरवा शालू, हिरवा चुडा लेवून आपल्या नव्या संसाराला प्रारंभ करते! चला तर मग, हिरव्या रंगाची शीतलता धारण करून संपूर्ण मानव सुखी-आनंदी-निरोगी झाला पाहिजे यासाठी प्रार्थना करूयात! ॐ देवी स्कन्दमातायै नमः॥

# ‘श्री दुर्गामाता दौड’ आणि छत्रपतींच्या जयजयकाराने सळसळले रक्त

## गरूड झेप मित्रमंडळ : छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज की जयचा जयघोष

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राजकारण, अर्थकारण, सत्ताकारण, पद, पैसा, प्रसिद्धी, जात-पात, पक्ष-प्रांत, संघटना, सुशिक्षित-अशिक्षित, लहान-मोठा, गरीब-श्रीमंत असे सर्व भेदाभेद विसरून संपूर्ण समाज एकत्रित करण्याकरिता गरुड झेप मित्र मंडळाच्यावतीने मागील अनेक वर्षांपासून ‘श्री दुर्गामाता दौड’ चे आयोजन सिडको जयभवानीनगर, एन २ येथे करण्यात येते. गरूड झेप मित्रमंडळाचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक सकाळी-सकळी हातात भगवे ध्वज,गळ्यात भगवे रुमाल आणि गपाळावर भला मोठा भगवाच टिळा लावून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजीमहाराज आणि इतर महापुरुषांच्या गगन भेदी घोषणा देत प्रभात फेरी काढतात. या सर्व सोहळा पाहणाऱ्यांचे अशा भक्तिमय आणि उत्साहवर्धक वातावरणामुळे जणू रक्त सळसळ करते. पाश्चात संस्कृतीत अडकलेल्या व इंग्रजाळलेल्या तरुणांना भारतीय संस्कृतीची जाणीव व्हावी व राष्ट्रभक्त तरुण घडावेत तसेच तरुणांमध्ये देशाभिमान जागृत व्हावा, या हेतूने ‘श्री दुर्गामाता दौड’चे नवरात्रीमध्ये आयोजन करण्यात येत असते. घटस्थापना ते विजयादशमी (दसरा)या नऊ दिवसामध्ये रोज सकाळी सहा वाजता परिसरातील सर्व लहान मोठे युवक सुयोग गणेश मंदीर सिडको, जयभावानीनगर येथे एकत्र येऊन देवीची महाआरती करतात. परिसरातील सर्व रस्त्यावर मानाच्या व्यक्तीच्या हातात भगवा ध्वज देऊन छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या राष्ट्रीय कार्याचे गौरव गाण करीत धावती प्रभात फेरी काढली जाते. या वेळी परिसरातील सर्व मंदिराचे दर्शन घेतले जाते. भगवा ध्वज मिरवण्याचा मान रोज वेगवेगळ्या व्यक्तीना दिला जातो. या ध्वजाचे जागोजागी कुंकू लावून आणि फुलेवाहून वंदन केले जाते. पांढरी वारकरी टोपी परिधान करून असंख्य



नागरिक या दुर्गामाता दौड मध्ये देवीच्या नामाचा जयघोष करत सहभागी होत असतात. दसऱ्याला परिसरातील महिला व मुली देखील मोठ्या संख्येने पारंपरिक वेशभूषा करून तर काही लहान मुले व मुली राम,लक्ष्मण, सीता, कृष्ण, राधा, हनुमान, छत्रपती शिवाजी महाराज, मावळे यांची रूप साकारून ‘श्री दुर्गामाता दौड’ मध्ये सहभागी झालेले दिसतात. या दिवशी परिसरातील महिलाचा गरुड झेप मित्र मंडळाच्यावतीने विशेष सन्मान करण्यात येतो.या वेळी देशहिताचे कार्य करण्याची सार्वजनिक शपथ घेतली जाते. ही ‘श्री दुर्गामाता दौड’ संपूर्ण नऊ दिवस मोठ्या उत्सहात आणि भक्तीमय वातावरणात काढली जाते. आपला देश आणि आपली संस्कृती टीकावी, या करिता गरुड झेप मित्र मंडळ विविध उपक्रमातुन सदैव प्रयत्न करीत असतात.

या कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता संस्थापक अध्यक्ष प्रमोद दिवेकर, नगरसेवक बालाजी मुंडे, राहुल दांडगे, विठ्ठल शेलार रामभाऊ दसपुते, नागनाथ आवळे,वाल्मिक पवार, दत्ता गरड,विजयराव अडलक, प्रशिक बिरारी, गोपाल जंगले, सचिन राठोड नितीन राठोड ,व्यंकटेश मुंडे, गोरख धाटबळे, सचिन तुरोरीकर, दीपक सोनवणे, आजिनाथ नलावडे, सुरेश गायकवाड,सुखदेव गायकवाड, गुलाब मोरे व इतर सर्व सदस्स प्रयत्न करत असतात.



# गंगापूर ते सिद्धपूर बससेवेला प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** गंगापूर ते सिद्धपूर बससेवेला आजपासून प्रारंभ करण्यात आला आहे.स्वातंत्र्याच्या पंचांहात्तर वर्षानंतर प्रथमच गावात आलेल्या बसचे सर्व ग्रामस्थानी व विद्यार्थ्यांनी मोठ्या जल्लोषात स्वागत केले.

याविषयी अधिक माहिती अशी की सिद्धपूर येथून जवळपास पस्तीस ते चाळीस मुली दररोज तीन साडेतीन किलोमीटरचा पायी प्रवास करून गंगापूरला शिक्षण घेण्यासाठी येत होत्या तसेच वयोवृद्ध लोकांची देखील गंगापूरला येण्यासाठी दमछाक होतं होती. दरम्यान मागील दीड दोन महिन्यांपूर्वी श्री स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष वाल्मिक शिरसाठ हे नियमित जनसंपर्क दौऱ्याच्या निमित्ताने सिद्धपूर येथे आले असता काही युवकांनी आणि विद्यार्थिनींनी ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. शिरसाठ यांनी तात्काळ एसटी महामंडळाचे जिल्हा वाहतूक नियंत्रक अमोल अहिरे, गंगापूर आगार प्रमुख मनीष जवळीकर यांच्याशी संपर्क साधून सविस्तर चर्चा केली तसेच गावातील काकासाहेब जाधव, गोविंद जाधव, अरुण ठोकळ, विलास जाधव, अनिल होण आदीनी निवेदन देऊन बस चालू करण्याची मागणी केली होती.

आज सकाळी साडेनऊ वाजता बसचे गावात आगमन होताच गावचे जेष्ठ नागरिक मच्छिन्द्र सातपुते,वाल्मिक शिरसाठ,ज्ञानेश्वर यादव, सागर पा जाधव, साईनाथ सातपुते यांच्यासह ग्रामस्थांनी बसचे पूजन करून आगार प्रमुख मनीष जवळीकर, साईनाथ भालेराव, बालाजी दवणे, सोनवणे आदींचा सत्कार करून आभार व्यक्त केले.

# मुरूमखेडा येथे नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील मुरूमखेडा येथे जलजीवन मिशन अंतर्गत 25 लाख रुपयांची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर झाली असून या योजने अंतर्गत येणाऱ्या दोन तीन महिन्यांत गावातील प्रत्येक कुटुंबातील घराजवळ नळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या योजनेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते ब्रिजगोपाल तोष्णीवाल यांचे हस्ते नुकतेच संपन्न झाले या कार्यक्रमाला व्यापारी असोसिएशन चे अध्यक्ष संजय भुतडा, वैजनाथअप्पा एकसिंगे, सिनया तिप्पेनलु,प्रमोद माकोडे,शिवाजी काकडे,ज्ञानोबा माकोडे, गुडू जैस्वाल, अनिल चव्हाण,जनार्धन संजय वावळे, सुभाष पाटोळे, राहुल डहाळे, परमेश्वर माकोडे, गजानन होडबे, ओम कापुरे, वावळे आदी उपस्थित होते, मुरूमखेडा या गावाला कायमस्वरूपी पिण्याचे पाणी मिळावे, म्हणून येथे शासनाच्या वतीने 65 लाख रुपयांची योजना मंजूर झाली होती मात्र, येथील राजकीय पुढाऱ्यांनी प्रशासकीय अधिकार्यांशी संगनमत करून योजनाच फस्थ केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते ब्रिजगोपाल तोष्णीवाल यांनी केला, श्रेय लाटूपणामुळे व स्वार्थ साधू धोरणामुळे येथे मंजूर झालेले योजनेचे काम पूर्ण पणे हडप केले परिणामी गाव येलदरी धरणाच्या पायथ्याशी असून देखिल मागील अनेक वर्षांपासून तहानलेले आहे, मात्र आता गावातील महिला सरपंच कविता प्रमोद माकोडे यांनी पुढाकार घेऊन गावातील महिलांना पाण्याचा त्रास होऊ नये म्हणून प्रत्येक घरी पाण्याचा नळ जोडून देण्याचा संकल्प केला आहे त्यानुसार गावातील ही समस्या निकाली काढण्यासाठी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करून प्रधानमंत्री जल जीवन मिशन योजने अंतर्गत निधी मंजूर करुन घेतला व प्रत्यक्ष कामास सुरुवात केली आहे यामुळे मुरूमखेडा गावामध्ये बऱ्याच दिवसांपासून पिण्याच्या व वापरण्याच्या पाण्याची समस्या आता कायमची सुटणार असून गावातील नागरिकांना पिण्याकरिता पाणी मिळणार आहे अशी माहिती गावाच्या महिला सरपंच कविता प्रमोद माकोडे यांनी दिली.



# सज्जन माणसे आणि चांगली पुस्तके भेटत नाही : अय्युब पठाण लोहगावकर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कला महाविद्यालय बिडकीन येथे नुकतेच हिंदी पंधरवाडा अंतर्गत हिंदी दिन समारंभ तथा मराठी विभागामार्फत, साहित्यिक आपल्या भेटीला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा प्रसिध्द साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना सांगितले की, आज काल सज्जन माणसे आणि चांगली पुस्तके लवकर भेटत नाहीत.

यावेळी पठाण यांची बालभारतीच्या पाठयपुस्तकात इयत्ता सहावीच्या अभ्यासक्रमात समाविष्ठ असलेली पाणपोई या कवितेचे प्रभावी वाचन केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन आहेर हे होते. तसेच कार्यक्रमाचे आयोजक डॉ. शेख मुखत्यार, डॉ. शेख मोहसीन, डॉ. अर्चना काटकर हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शेख मुखत्यार यांनी केले. तर कार्यक्रमासाठी डॉ. प्रसाद करंदीकर, डॉ. अर्चना सोनवणे, डॉ. अंजली काळे, डॉ. रामकिशन मुंडे, संभाजी आंधळे, अण्णासाहेब थिटे, शेख कय्युम आणि महाविद्यालयातील विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. साक्षी भाले हीने केले तर आभार प्रदर्शन डॉ. शेख मोहसीन यांनी मानले.




# पांढरे सोने खाणार भाव ? तेजीत राहणार भाव पण उत्पादन घटणार

## सोयगाव तालुक्यात ६८८६५ हेक्टरवर कापूस लागवड

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** गेली अनेक दिवसापासून शेतकरी अस्मानी- सुलतानी संकटाचा सामना करीत असून कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळाने तो होरपळला असताना या वर्षी पडलेल्या पावसाने व मध्यंतरी गेली अनेक दिवस सूर्यदर्शन न झाल्याने खरीप पिकांचे उत्पादन घटणार असले तरी शेतकऱ्यांचे पांढरं सोनं म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसालाही पावसाचा फटका बसला असून यावर्षी मात्र कापूस पिकाची पाहिजे अशी वाढ न झाल्याने उत्पादन घटनार असले तरी कापसाला मिळत असलेला भाव पाहता पांढरे सोन मात्र तेजीत राहणार असल्याचे चित्र दिसत आहे .

सोयगाव तालुक्यात ६८८६५ हेक्टरवर कापसाची लागवड झाली असून सोयगाव तालुक्याच्या पश्चिम - पूर्व भागात कपाशी या पिकाची लागवड मोठया प्रमाणात केली जाते,तर उत्तर भागातही कमी प्रमाणात कापसाचे उत्पादन घेतले जाते, यावर्षी पाऊस व खराब वातावरणामुळे कापूस पिकाचे नुकसान झाले आहे. तालुक्याच्या पश्चिम पूर्व भागात यावर्षी गणेश चतुर्थी , दसऱ्यापासुन कापूस वेचणीला सुरुवात होणार असून इतर पिकांची कामेही बरोबर आल्याने कापूस वेचणीसाठी मजुरांची कमतरता भासणार आहे.

यावर्षी पश्चिम पूर्व भागाबरोबरच तालुक्यातील उत्तर भागातही बागायती क्षेत्रात शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनावर कापसाचे लागवड केली असून सध्या ८ ते ११ हजार रुपये कापसाला भाव मिळत असून ही स्थिती कायम राहण्याची शेतकऱ्यांना अशा आहे.



यावर्षीच्या खरीप हंगामातील कापसाची पेरणी ही मृग नक्षत्रात तर तालुक्याच्या पश्चिम भागात आद्रा या नक्षत्रात झाल्यामुळे झाल्यामुळे बागायती व कोरडवाहू या दोन्ही कपाशीची वेचणी एकत्र येणार आहे. परिणामी मजुरांची तारांबळ उडून शेतकऱ्यांना १० ते १५ रुपये प्रति किलो वेचणीसाठी मोजावे लागणार आहे. तसेही यावर्षी वेळोवेळी, अवकाळी, रिमझिम पाऊस पडत गेल्याने कपाशीच्या पीकाची वाढ खुंटून कपाशीवर करप्यासदृश्य रोगाचा प्रादुर्भाव झाला. साहजिकच उत्पन्नात घट जाणवत असली तरी कापसाला भाव चांगला असल्याने त्यामध्ये तुट भरुन निघणार आहे.

कापूस पिकासाठी एकरी लागवडीपासून ते वेचणीपर्यंत वीस - पंचवीस हजार रुपये खर्च येतो. मी तीन एकरावर कापसाची लागवड केली असून आतापर्यंत कापसाचे पीक तग धरून असून वातावरणाने साथ दिल्यास येथील दहा क्विंटल पर्यंत कापूस निघेल अशी आशा असून चांगला भाव राहील अशी आशा आहे.

# पो.कॉ. कुणाल पानपाटील यांची चौकशी करून कारवाई करा

## गुंडांचा मास्टरमाईंड : लोकजन शक्ती पार्टीची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अवैध धंदेधारकांकडून महिन्याला हप्ता वसुलीच्या नावावर एक कोटी रुपये खंडणी वसुल करणारा गुंडांचा मास्टर माईंड पो.कॉ. कुणाल पानपाटील व त्याने हप्ता वसुल करण्यासाठी २० हजार रुपये महिन्याने कामाला लावलेला गुंड कृष्णा अहिरे यांची सखोलपणे चौकशी करून कारवाई करावी अशा आशयाचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक प्रवीण कुमार पाटील यांना लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने देण्यात आले आहे. तसेच या मागणी संदर्भात लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली आहे. लोकजनशक्ती पार्टी धुळे जिल्हा महिला आघाडी वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की धुळे शहरासह धुळे जिल्ह्यात क्रिमिनल गावगुंडांचा मास्टर माईड पो.कॉ. कुणाल पानपाटील हा हप्ता वसुली करण्यासाठी गावगुंडाचा म्होरक्या म्हणून प्रसिध्द आहे, धुळे शहरात त्याचे अनेक गावगुंड, नशेखोर, चोर, खंडणी बहाद्दर जातीय तणाव निर्माण करणारे व दंगल घडविणाऱ्यांशी जवळीक संबंध आहेत, धुळे शहरातील डांबर, केमीकल, सट्टा, बनावट दारु, क्लब व इतर अवैध धंद्यामध्ये तो भागीदार अशा धंद्याच्या माध्यमातून तो महिन्याला एक कोटी रुपये खंडणी वसुल करतो. त्या हप्त्याची वसुली करुन त्याचे धुळे शहरात भव्य बंगल्याचे काम देखील चालू आहे. त्याने हप्ता वसुल करण्यासाठी २० हजार रुपये महिन्याने कृष्णा अहिरे नावाच्या नशेखोर गावगुंडाला हप्ता वसुलीसाठी कामाला लावलेले आहे.असा आरोप निवेदनातून लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने करण्यात आला आहे. पो.कॉ.



कुणाल पानपाटील याचे मोबाईलचे संभाषण (सीआरडी) तपासले तर त्याचे कोणत्या गुंडाशी संबंध आहेत, ते सर्व सत्य बाहेर येईल व धुळे शहरात ज्या ज्या ठिकाणी अवैध धंदे सुरु आहेत. त्या ठिकाणचे येण्या - जाण्याच्या मार्गावरील सिसीटीव्हीचे फुटेज घेतले तर ते ही उघडकीस येईल. तसेच सफारी गाडी क्र . MH - 18 Q - 1111 ही काळ्या रंगाची गाडी जाळण्यामागील पोलीस कॉ. कुणाल पानपाटील हाच असल्याची दाट शक्यताही धुळे लोक जनशक्ती पार्टीने वर्तविले आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येऊन कारवाई करावी. अशा मागणीचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक प्रवीण कुमार पाटील यांना देण्यात आला आहे. या मागणी संदर्भात शहरातील महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ आंदोलनातून घोषणाबाजी ही करण्यात आली आहे.

याप्रसंगी लोक जनशक्ती पार्टीचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप साळवे, धुळे जिल्हा महिला अध्यक्ष शोभाताई चव्हाण, महासचिव कुंदन खरात, मधुकर चव्हाण, राज साळवे,सुरज साळवे, सिद्धांत साळवे, प्रमोद सोनवणे, सागर चव्हाण, गौतम बोरसे, शुभम साळवे, पिंटू अमृतसागर, आदी यावेळी उपस्थित होते.



# आदर्श शिक्षक पुरस्काराने सिराज अली खान सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**मानवत :** शहरातील गालिब नगर येथील इकरा उर्दू शाळेचे मुख्याध्यापक सिराज अली खान यांना दिनांक २७ सप्टेंबर रोजी आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. परभणी येथील बी. रघुनाथ सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्र मात त्यांना हा आदर्श पुरस्कार ऑल- इंडिया - मजलिजे - इतेहादुल मुस्लिम महाराष्ट्र महासचिव मौलाना रफिय्योदिन व ऑल - इंडिया - मजलिजे - इतेहादुल मुस्लिम जिल्हाध्यक्ष ऍड. इम्तियाज खान यांच्या वतीने हा नकीबे मिल्लत पुरस्कार आदर्श शिक्षक म्हणून देण्यात आला. सिराज अली खान हे मानवत येथील इकरा उर्दू शाळेचे एक आदर्श मुख्याध्यापक असून त्यांनी आपला जीव तोडून शाळेतील विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्वल कसे करता येईल या साठी त्यांचे सातत्याने प्रयत्न सुरु असतात त्यांचे हे उत्कृष्ट कार्य पाहता त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या मुळे त्यांचे शिक्षण क्षेत्रा सह सर्वत्र अभिनंदन केल्या जात आहे.

# 75 वर्षे वय त्यांना बस प्रवास मोफत!

## महामंडळाची डोकेदुखी की खासगीकरणाकडे वाटचाल ?

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** महाराष्ट्र राज्य सरकारने स्वातंत्र्याच्या आमृतमोत्सवी आदेश पारित करून महाराष्ट्र राज्यात ज्याचे वय 75 वर्ष वयापेक्षा जास्त आहे, अशा जेष्ठ नागरीकांना राज्यात कुठेही प्रवास करीत असाल तर महामंडळाच्या बसेसला प्रवास भाडे लागणार नाही, मोफत प्रवास करता येइल आसा उपकृम राज्यात महामंडळ राबवित आहे. हा उपकृम एक प्रकारे जेष्ठ नागरीकांसाठी फायदेशिर ठरणारा आसला तरी महामंडळाची डोके दूखी ठरत असल्याचे दिसून येत आहे, अशी माहिती प्रा. सामाजिक कार्यकर्ते मदनभाऊ डोखळे डाभा यांनी बोलताना सांगितले. राज्य सरकारने ठरवून दिल्या प्रमाणे ज्याचे वय 75 वर्ष झाले असलेल्या नागरीकास महारष्ट्रात बसमध्ये मोफत प्रवास ही योजना राबवण्याचे आदेश पारित केले. दरम्यान त्या नुसार महामंडळा कडून हा आदेश आमलात आनत आसताना मात्र वहाकास तारेवरची कसरत करावे लागात आहे. शासनाने ठरवून दिलेल्या वयाचा दाखला म्हणून आधारकार्ड, मतदान ओळख पत्र, पॅन कार्ड या पैकी कोणतेही पूरावा म्हणून ओळख पत्र असेल तर चालतो या आदेशान्वये प्रवाशी ओळख पत्र दाखवत आहेत व प्रवास सुद्धा करीत आहेत मात्र ज्याचे वय 50 ते 55 आहे तरी तो प्रवाशी अवैध पदधतीने काढलेले बोगस ओळख पत्र दाखवून प्रवास करीत आहेत वाहकाना समजून सुद्धा प्रवाशाना कांहीच म्हणता येत नाही, अशा मोफत प्रवास करणाऱ्या प्रवाशाची सद्या संख्या बस मध्ये 60/ ते 70/ दिसून येत आहेत त्यात 65 वर्षवरील जेष्ठ नागरीक 50% सवलतीची संख्या 10 % अपग । % ते २ % टक्के तर फूल तिकीट देऊन 5% ते 10% प्रवाशी प्रवास करताना दिसून येत आहेत सद्या महामंडळाच्या बसेस मात्र गचागच भरून जात आहेत मात्र महामंडळाचे उत्पन्न घटत आहे. महामंडळाच्या बसेसना सद्या बाहेरील खाजगी डिझेल पंपद्वारे डिझेल घ्यावे लागत आहेत. उत्तपन कमी झाल्यामुळे डिझेलसाठी चनचन भासत आसलेले दिसून येत आहे.



वरिष्ठ आधिकारी कर्मचाऱ्यास सुचना करतात उत्तपन्न वाढवा , बसमध्ये प्रवाशी खचाखच भरलेले मात्र उत्पन्न कमी, शासनाचे धोरन राबवणे प्रवाशासाठी सुवेधाचा उपकृम मात्र बोगस गीरी प्रवाशा मुळे महामंडळाची डोके दु :खी ठरत असलेले दिसून येत आहेत या वर राज्य शासन किवा महामंडळाकडून काही ठोस निर्णय घेतले गेले नाहीतर भविष्यात महामंडळाचे चाके थांबतील किंवा उत्पन्न कमीच्या शिर्षकाखाली खाजगी करणाची चाहुलच आहे की काय ? असा प्रश्न सामान्य प्रवाशाना पडलेले दिसून येत आहे .

**प्रा . मदनभाऊ डोखळे, सामाजिक कार्यकर्ते, डाभा, ता . सोयगाव**

# अंधश्रद्धा चमत्कार व त्यामागील विज्ञान कार्यक्रम

## सावळदबारा : सपोनि देवीदास वाघमोडे यांनी मार्गदर्शन करुन पाण्यावर दिवा दाखविला पेटवून

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे विठ्ठल रुखमिणी मंदीरावर जय भवानी मित्र मंडळच्या वतीने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती यांच्या विद्यमाने चालू दृढ रुढी परंपरा व अंधश्रद्धा याबाबत याविषयी भाऊ पठाडे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा अध्यक्ष औरंगाबाद, प्रा.शिवाजी वाठोरे,सुनील चौतमल,प्रशांत कांबळे, कृष्णा पाटील, जगदीश सोनवणे यांनी ग्रामस्थांना पटनाट्य व जादूचे प्रयोग सादर केले. जय भवानी मित्र मंडळ सावळदबारा यांच्या व गावकरी यांच्या संयुक्त विद्यमाने व सहकार्याने यावर्षी दुर्गादेवी उत्सवानिमित्त सावळदबारा येथे २८/९/२२ बुधवार रोजी रोजी हरिहर मंदिर संस्थान सावळदबारा येथील सभागृहातचमत्कार व त्यामागील विज्ञान या नारी शक्ती उपक्रमांतर्गत होणाऱ्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता समाजातील अंधश्रद्धा दृढ रुढी व परंपरा यामुळे होणारा जीवितहानी व नरबळी यासारख्या प्रथा मोडीत काढण्यासाठी समाजात जनजागृती व्हावी व समाज गुण्यागोविंदाने व धार्मिक रितीरिवाजाप्रमाणे वागावे यासाठी आयोजित केलेल्या भाऊ पठाडे जिल्हाध्यक्ष यांनी सांगितले की राज्यघटनेच्या कलमाप्रमाणे प्रत्येक जाती धर्माला उपासना करण्याचा अधिकार राज्यघटनेने दिलेला आहे. परंतु त्या मागचे वैज्ञानिक दृष्टी कोण जपासुनच ते करावे माणसाच्या डोक्यामध्ये दृष्ट परिणाम घडवून आणून समाजातील स्त्रिया लहान मुले व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होईल अशा कोणत्याही प्रकारच्या बुवाबाजीच्या व अंधश्रद्धेच्या नादी लागून कोणत्याही प्रकारची उपासना करता कामा नये. मानवी जीवनावर याचा मानसिक शारीरिक व आर्थिक परिणाम होऊन अनेक कुटुंब व



अनेक व्यक्ती बरबाद झालेले आपण बघतो. तेव्हा कर्मापेक्षा व स्वतःच्या धर्मापेक्षा जगात काही श्रेष्ठ नाही माणसांनी माणसं जगावे व वृक्ष वाढवावे त्यातच खरं देवपण व माणूस पण लपलेले आहे असे मार्गदर्शन त्यांनी केले. कशाप्रकारे रासायनिक घटकांचा वापर करून दिवे पेटवणे रासायनिक अभिक्रियाद्वारे लाल दोरे काळे करणे पाण्याच्या दबावा द्वारे व हवेच्या दबावा द्वारे रिकाम्या तांब्यातून तीर्थ बाहेर काढणे जळता कापूर तोंडात घेणे खाली ग्लासातून पाण्याचे मुरमुरे पोहे करणे या सर्व वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर करून कशाप्रकारे हे जादूचे प्रयोग केले जातात याची फोड करून जिल्हाध्यक्षांनी मार्गदर्शन केले तर पशुदया हाच खरा धर्म मानून साप विंचू यापासून मानवी जीवाला धोका नसून कशाप्रकारे स्वतःचे रक्षण त्यांच्यापासून करावे व शेतकरी राजाला तारावे असे मार्गदर्शन सोनवणे यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष पोलीस सहायक निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी यासाठी कायदा व सुव्यवस्था कोणीही हातात घेऊ नये व समाजात भीतीचे वातावरण पसरवू नये जेणेकरून एखाद्याचा जीव जाऊ शकतो व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहू शकतो अशा कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करणाऱ्या इसमास माफ केले जाणार नाही तेव्हा अशा अघोरी रूढी परंपरा थांबवण्यासाठी जनतेने आम्हाला सहकार्य करावे व अशा कृत्य करणाऱ्या इसमाचे नाव आम्हाला सांगावे जेणेकरून अशा गोष्टीला आळा घालण्यात येईल अशी ग्वाही यावेळेस बोलताना दिली कार्यक्रमात फर्दापूर येथील पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक सपोनि देविदास वाघमोडे यांनी सर्व ग्रामस्थांना अंधश्रद्धा विषयी सखोल जनजागृती मार्गदर्शन करून पाण्यावरती दिवा पेटवून दाखविला व कार्यक्रमाचे उदघाटन केले दिवा कशा प्रकारे पेटविला जातो त्या मागचे कारण स्पष्ट करून सांगितले अंधश्रद्धेला बळी पडू नका अशी माहिती दिली. आमच्या गावात व समाजात निर्माण होणारी भीती अनमोल मार्गदर्शनामुळे निश्चितच दूर झालेली आहे परिणामी सर्व तरुण बालक व स्त्रियांमधील आनंद पाहून यापुढे अशा कोणत्याही बुवाबाजीच्या व अंधश्रद्धेच्या नांदी आम्ही सावळदबारावासीय लागणार नाहीत अशी ग्वाही गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.जीवन कोलतेयांनी केले. यावेळी सहा पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे,उपनिरीक्षक रणजित कासले,बिट जमादार मिरखाँ तडवी, पो.विलास कुल्ले, उपसरपंच मो.आरिफ मो. ग्रामपंचायत सदस्य दीपक मानकर संदीप सूर्यवंशी, विनोद टिकारे, मोहन सुरडकर, संजय राजपूत, शेख बिस्मिल्ला, सुनील शिप्पलकर, वारकरी संप्रदायाचे वासुदेव महाराज खडके, पंढरी महाराज सपाटे, बेलाप्पा कर्दळे, भागवत महाजन सोपान मानकर सुनील राजपूत, सुरपाटणे, विशाल खडके, धोंडू महाराज गरुड गावातील आजी-माजी सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य चेअरमन गावातील ज्येष्ठ प्रतिष्ठित नागरिक सर्व मंडळाचे पदाधिकारी गावातील तरुण मित्रमंडळी व गावातील माता-भगिनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या.



# सावळी येथील साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे सभागृहाचे काम पूर्णत्वाकडे

आधुनिक केसरी न्यूज

**मानवत :** तालुक्यातील मौ. सावळी येथे समाज कल्याण विभाग अंतर्गत दहा लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात येणाऱ्या लोक शाहिर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे सभागृहाचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले असून गेली अनेक वर्षा पासून येथील वस्तीतील नागरीकांची सभागृह बांधण्याची मागणी सातत्याने होत होती अखेर ही मागणी पूर्ण झाली असून सावळी ग्राम पंचायतीचे कर्तव्य निष्ठ सरपंच माणिकराव काळे पाटील यांच्या प्रयत्नातून बांधण्यात येणाऱ्या सभागृहाचे बांधकाम काम पूर्णत्वाकडे असून गेली काही वर्षा पासून नागरिकांतुन होणारी मागणी अखेर पूर्ण झाली आहे. यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

# गॅस सिलिंडरच्या वापरावर मर्यादा : सुप्रिया सुळेंची सरकारवर जोरदार टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उज्वला गॅस योजनेतून ग्राहकांना केवळ १२ सिलिंडर देण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मोदी सरकारवर जोरदार टीका केली आहे. एकीकडे एलपीजी गॅस सिलिंडर दरात भरमसाठ वाढ करायची आणि दुसरीकडे गॅस सिलिंडर वापरावर मर्यादा आणायची, यातून केंद्र सरकारची असंवेदनशीलता दिसून येते, असे त्या म्हणाल्या. तसेच केंद्र सरकारची कार्यपद्धती कुचकामी असल्याची टीकाही त्यांनी केली आहे. ऐन नवरात्रौत्सवात देशातील महिलांच्या हिताचा निर्णय घेण्याऐवजी मोदी सरकारने गृहिणींच्या चिंतेत आणखी भर घालण्याचं काम केले आहे. एकीकडे एलपीजी गॅस सिलिंडर दरात भरमसाठ वाढ करायची आणि दुसरीकडे गॅस सिलिंडर वापरावर मर्यादा आणायची, यातून केंद्र सरकार किती असंवेदनशील आहे हेच दिसून येते, अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारवर केली आहे.



केंद्राच्या नव्या नियमानुसार उज्वला गॅस योजनेचा लाभार्थी नसलेल्या ग्राहकाला वर्षभरात केवळ १५ आणि अनुदानित असलेल्या ग्राहकाला १२ तर दोघांसाठीही महिन्याचा कोटा २ सिलिंडरचा करून मोदी सरकारने प्रत्येक गृहिणीच्या चिंतेत आणखी भर घातली आहे. तर दुसरीकडे एखाद्या ग्राहकाला जर गॅस सिलिंडरची आवश्यकता असल्यास त्यासाठी गॅस सिलिंडर कंपनीच्या अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागेल. तसेच त्याचा पुरावा देऊन, त्यासाठी कागदपत्र सादर करून त्यानंतरच त्या ग्राहकाला अतिरिक्त रिफिल मिळू शकेल. एकीकडे 'ई-गव्हर्नन्सचा' गाजावाजा करायचा आणि दुसरीकडे अतिरिक्त गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी पुन्हा नागरिकांना कागदपत्रं घेऊन खटाटोप करायला लावायचा यातून केंद्र सरकारची कार्यपद्धती किती कुचकामी आहे हेच पाहायला मिळते", असा घणाघात त्यांनी केला. ऐन दिवाळी सणाच्या तोंडावर केंद्र सरकारने हा निर्णय घेऊन



समस्त महिला वर्गाची अक्षरशः चेष्टाच केली आहे. संसाराचा रहाटगाडा चालवायचा कसा असा प्रश्न आता माझ्यासह देशातील अनेक गृहिणींना पडलाय. देशात मोठ्या प्रमाणावर सण उत्सव साजरे केले जातात. या सणावळीत विविध पक्वान्न, खाद्यपदार्थ तयार करण्याची परंपरा आहे. त्यामुळे घराघरात या काळात गॅस सिलिंडरची सर्वाधिक आवश्यकता असते. पण केंद्राच्या केवळ १५ सिलिंडरच घेण्याच्या नियमामुळे देशवासियांना मर्यादेमध्ये गॅस सिलिंडर वापरावा लागणार असून आपले सण उत्सव हे बंधन घालूनच साजरे करावे लागणारेत की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, असेही त्या म्हणाल्या. केवळ सण उत्सवच नव्हे तर अनेक महिला या घरगुती डबे पुरवण्याचे काम करतात किंवा अनेक विद्यार्थी पेईंग गेस्ट किंवा समूहाने राहतात, अशांसाठी गॅस सिलिंडरची जास्त आवश्यकता असते. परंतु या निर्णयाने महिला, विद्यार्थी व पेईंग गेस्टसारख्या सर्वांनाच चिंतेत टाकण्याचं काम मोदी सरकारने केलं आहे. देशवासियांच्या घरगुती एलपीजी गॅस सिलिंडर वापरावर बंधन घालून केंद्रातील भाजप सरकारने थेट नागरिकांच्या जेवणावर, सण उत्सव साजरे करण्यावर व एकंदरीत मुलभूत हक्कांवरच बंधन घातलं आहे. एक गृहिणी म्हणून मी या निर्णयाचा जाहीर निषेध करते, असेही त्या म्हणाल्या.



## क्रांतिवीरांच्या शौर्यगाथेने शेवगावचे रसिक-प्रेक्षक भारावले

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनायाच्या वतीने आयोजित अनामवीर नाईक कृष्णाजी साबळे यांच्या जीवन कार्यावर आधारित 'क्रांतिवीरांची शौर्यगाथा' या सांस्कृतिक कार्यक्रमाने शेवगावचे रसिक श्रोते भारावून गेले. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवशाहीर कल्याण काळे यांनी सादर केलेली क्रांती गीते, शाहिरी, पोवाडे व राष्ट्रीय भारुडकार हमीद सय्यद यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीते व प्रबोधन पर भारुडाने रसिकांच्या मनावर गारुड केले. श्री पावन मारुती मंदिर देवस्थान ट्रस्टच्या आवारातील सभागृहात बुधवार दिनांक २८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते ३ असा ३ तास 'क्रांतिवीरांची शौर्यगाथा' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाला. शिवशाहीर कल्याण काळे यांनी आपल्या पहाडी आवाजात सादर केलेल्या 'जय जय महाराष्ट्र माझा' या महाराष्ट्राचा जयजयकार करणाऱ्या गीताने या कार्यक्रमास प्रारंभ झाला. त्यानंतर अनामवीर नाईक कृष्णाजी साबळे यांच्या जीवन कार्यावर आधारित त्यांच्या शौर्य आणि पराक्रमाची माहिती सांगणारा पोवाडा सादर झाला. शहीद भगतसिंग यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून त्यांच्या पुतळ्यास व प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून शिवशाहीर कल्याण काळे यांनी शहीद भगतसिंग यांचा क्रांतिकारी पोवाडा सादर केला. राष्ट्रीय भारूडकार हमीद सय्यद यांनी प्रबोधनपर भारुड सादर केले. त्यानंतर शिवशाहीर कल्याण काळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा सादर केला. नवोदित शाहीर अक्षय डांगरे यांनी स्वातंत्र्य संग्रामाच्या पराक्रमी इतिहासाचे वर्णन करणारा पोवाडा सादर केला. जालिंदर जाधव यांनी अप्रतिम असे थाळी व समई नृत्य सादर केले. गाणसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राष्ट्रीय भारूडकार हमीद सय्यद यांनी सादर केलेल्या 'ए मेरे वतन के लोगो' या गीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. लोककला अभ्यासक, लेखक, पत्रकार भगवान राऊत त्यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शेवगाव पंचायत समितीच्या सहाय्यक गटविकास अधिकारी दिप्ती गाठ यांच्या हस्ते शहीद भगतसिंग यांच्या पुतळ्यास तसेच छत्रपती शिवाजी महाराज, अनामवीर नाईक कृष्णाजी साबळे, गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. यावेळी ह.भ. प. मारुती महाराज झिरपे, शिवभक्त चंद्रकांत लबडे महाराज, ॲड. कॉ. सुभाष लांडे, राजश्री रसाळ, डॉ. ओंकार रसाळ, नगरसेवक सागर फडके, कॉ. संजय नांगरे सावरकर मॅडम यांच्यासह महिला व पुरुष श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास कीबोर्ड वर दीपक काळे, ढोलकी वर प्रमोद दळवी, तालवाद्यवर भाऊसाहेब मनाळ यांनी संगीत साथ दिली. तर ईश्वर वाघमारे, अक्षय डांगरे व भगवान राऊत यांनी गायन साथ दिली. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी श्री पावन मारुती मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजय काळे, उपाध्यक्ष नवनाथ कवडे, सचिव राजेंद्र जगनाडे, खजिनदार मच्छिंद्र बर्वे, कायदेशीर सल्लागार जयप्रकाश देशमुख, डॉ. कृष्णा देहाडराय, डॉ.लांडे आदींनी सहकार्य केले.

## ज्ञानोपासक महाविद्यालय सभागृहात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जीवनपट चित्रप्रदर्शनीचे उद्‌घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'सेवा पंधरवाडा' साजरा करण्यात येत आहे. प्रधानमंत्र्याच्या जीवनावरील कार्यगौरव चित्र प्रदर्शनाचे उदघाटन स्वातंत्र्य सैनिक विजय जोशी आणि आबासाहेब देशपांडे यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाचे आयोजन भाजपा जिल्हा उपाध्यक्ष शिंदे समीर गणेशराव (दुधगांवकर) यांनी केले होते आणि महानगर संयोजक कमलकिशोर अग्रवाल, संजय रिझवानी यांची नियोजनात मदत होती. ज्ञानोपासक महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रदर्शनी 29, 30 आणि 1 ऑक्टोबर रोजी सकाळी 10 ते रात्री 7 पर्यंत खूली असेल. जीवनपट कार्यगौरव चित्र प्रदर्शनामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आयुष्याबाबत व त्यांच्या कार्याबद्दल मांडणी आहे. विश्वातील त्यांच्या अतूलनिय कार्याचा आढावा या चित्र प्रदर्शनात मांडला आहे. या चित्र प्रदर्शनाला पूर्णा, मानवत व परभणी तालुक्यातील नागरिकांनी प्रदर्षणी बघून गेले व तसेच इतरत्र ठिकाणाहून अनेक नागरिक, विद्यार्थी, पालक, भेट देत असून चित्रप्रदर्शनाचा लाभ घेत आहेत. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भाजपा जिल्हा पदाधिकारी एन डी देशमुख, प्रमोद कराड, प्रमोद वाकोडकर, प्रभावतीताई अनपूर्वे व टिम समीर यांनी परिश्रम घेतले.



## पालखेड धरणाचे शाखा अभियंता व ग्रामस्थांकडून जलपूजन



आधुनिक केसरी न्यूज

दिंडोरी : तालुक्यातील पालखेड बंधारा येथील धरणाचे जलपूजन शाखा अभियंता सुदर्शन सानप ग्रामपंचायत सदस्य बबलू गायकवाड सामाजिक कार्यकर्ते बापू चव्हाण सचिन गायकवाड आदींच्या हस्ते करण्यात आले. दुपारी झालेल्या या कार्यक्रमात धरणातील पाण्याचे पूजन करून पाण्यामध्ये श्रीफळ सोडण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य बबलू गायकवाड यांनी शाखा अभियंता सुदर्शन यांचा साल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तर सानप यांनी सामाजिक कार्यकर्ते बापू चव्हाण यांना कादवा गौरव पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सानप यांनी धरणाच्या प्रती व निसर्गाच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी प्रमाणे यावर्षी हे पूजन करण्यात आले.याशिवाय पावसाची विक्रमी नोंदही करण्यात आली होती. होत असलेल्या पावसामुळे तालुक्यातील काही धरणांमधून पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.पालखेड धरणाचे ही गेट अनेक वेळा सोडण्यात आल्यास या पाण्याचाचा निसर्ग कादवा नदी पात्रातून केला जात असल्याचे सानप यांनी सांगितले. आजही परतीचा पाऊस सुरूच असल्याने काम करणारे सर्व कर्मचारी अहोरात्र जागून पाणी सोडण्यासाठी तत्परत असतात. याशिवाय अनेक गावांचा शेतीपिकांना लागणाऱ्या पाण्याचा तसेच पिण्याचा पाण्याचा प्रश्नही यावर्षी बऱ्यापैकी सुटला असल्याने धरण परिसरातील असणाऱ्या गावांनी व इतर तालुक्यातही आनंदाचे वातावरण पाहावयास मिळत आहे.याप्रसंगी ज्ञानेश्वर लोखंडे सुनील गांगुर्डे सुनील पवार साहेबराव हेंद्रे सोमनाथ बदादे लालू कोकाटे रवी दुताडे अतुल पालवे अधिक कर्मचारी उपस्थित होते.

# पैठण तालुक्यात घोणस अळीचा प्रादुर्भाव; शेतकरी चिंताग्रस्त



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील टाकळी,धनगाव या परिसरात घोणस अळीचा प्रादुर्भाव वाढत आहे. टाकळी येथील शेतकऱ्यांचा अळीने चावा घेतल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. घोणस अळीने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे केले आहे. या अळीच्या चाव्याने अर्धे शरीर बधीर होते. ही अळी प्रामुख्याने ऊसाच्या फडात, गवत व मका या पिकांवर जास्त प्रमाणात आढळून येत आहे. या अळीचे वैज्ञानिक नाव 'स्लग कॅटरपिल्लर' असे आहे. ब्लेड सारखी काटेरी आकार असलेली ही अळी विषारी आहे. पिवळा व हिरवा रंगाच्या या अळीच्या अंगावर काटे असतात. पिकांना अपायकारक असलेल्या या अळीचे शेतकऱ्यांसमोरही मोठे संकट उभे राहिले आहे. घोणस अळी शक्यतो ऊस व गवतावर दिसून येते. घोणस आळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास कोणतेही स्पर्शजन कीटकनाशक फवारावे. यामुळे अळीचे नियंत्रण होऊ शकते. अळीने चावा घेतल्यास घाबरून न जाता जवळच्या डॉक्टरकडे जाऊन योग्य ते उपचार घ्यावे. कोणतेही स्पर्शजन्य किटकनाशक फवारावे. यामध्ये क्विनालफास, इमामेक्टिन बेंझोएट, फ्लूबेंडामाईड सारखे कीटकनाशक शिफारस नसले तरी चांगले नियंत्रण करतात. तसेच बरेच नैसर्गिक मित्र कीटकांद्वारे ही या किडीचे नियंत्रण नैसर्गिकरित्याच होते. तरी सर्वांनी कोणत्याही "केसाळ" किंवा "काटेरी" अळ्यापासून स्वरक्षणाची सावधगिरी बाळगावी. अळी मुळे दंश झाल्यास घाबरून न जाता योग्य उपाय अथवा उपचार करावेत. असे अवाहन संदीप शिरसाट तालुका कृषी अधिकारी,यानी केले आहे.

# आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत स्व. नितीन महाविद्यालयाची बाजी

## बहिर्जी स्मारक महाविद्यालयाला सर्वसाधारण विजेतेपद

आधुनिक केसरी न्यूज

**पाथरी :** आजादी का अमृत मोहत्सव अंतर्गत स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत स्व. नितीन महाविद्यालय पाथरी येथे आयोजीत आंतरमहाविद्यालयीन 'ड' झोन कुस्ती स्पर्धेत स्व नितीन महाविद्यालयाचा कुस्तिगिर पांडूरंग सुदामराव श्रावणे याने बाजी मारत न्यू मॉडेल डिग्री महाविद्यालय, हिंगोलीच्या अदनान शेख याला चितपट करत ८६ किलो वजनी गटात अजिंक्यपद पटकावले. येथील स्व नितीन महाविद्यालयाच्या भव्यदिव्य क्रिडा हॉलमध्ये मॅट वरील कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत हिंगोली, परभणी जिल्ह्यातील पंधरा महाविद्यालयाच्या ३५ कुस्तीगिरांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेच्या ५७



किलो वजनी गटात गुरूबुद्धी स्वामी महाविद्यालयाचा भुजंग खंदारे प्रथम आला तर कै रमेश वरपुडकर महाविद्यालयाचा कपील पाटील व्दितीय आला. ६१ किलो वजनी गटात के के एम महाविद्यालयाचा सागर कदम प्रथम आला. त्याने प्रतिस्पर्धी शारदा महाविद्यालय परभणीच्या शुभम मुटकुळे याला चितपट केले. ६५ किलो वजनी गटात तोष्णीवाल महाविद्यालयचा अदिनाथ जाधव प्रथम आला. त्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाविद्यालय, राणीसावरगावच्या गोपाळ बिडगर याला चितपट केले. ७० किलो वजनी गटात बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमतचा अमोल मुळे प्रथम आला त्याने नागनाथ महाविद्यालय औंढ्याच्या वैभव आडणे ला चितपट केले. ७४ किलो वजनी गटात बहिर्जी स्मारक महाविद्यालयाच्या प्रशांत कदम याने प्रथम क्रमांक पटकावला त्याने कै रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठच्या सुनिल पांचाळ याला चितपट केले. शेवटी ८६ किलो वजन गटातील कुस्तीत स्व. नितीन महाविद्यालयाच्या पांडूरंग श्रावने याने हिंगोलीच्या न्यू मॉडेल डिग्री महाविद्यालयाच्या अदनान शेख याला विस सेकंदात आस्मान दाखवत प्रथम क्रमांक पटकावला. या कुस्ती स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद वसमतच्या बहिर्जी स्मारक महाविद्यालयाने पटकावले. स्पर्धेचे उदघाटन छत्रपती पुरस्कार विजेते डॉ. माधव शेजूळ यांच्या हस्ते स्पर्धेचे उदघाटन झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर.एस. फुन्ने तर प्रमुख उपस्थितीत 'ड' झोनचे सचिव मिनानाथ गोमचाळे, प्रा. भारत निर्वळ, आयोजक मंडळाचे क्रिडाविभा प्रमुख प्रा. डॉ. अंकुश सोळंके यांची उपस्थिती होती. यावेळी प्रा. डॉ. माधव शेजुळ प्राचार्य डॉ. आर. एस. फुन्ने यांनी शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले. या स्पर्धेसाठी राष्ट्रीय पंच गोविंद नवनाथ घाडगे, शेख नफीजा यांनी काम पाहिले. प्राचार्य डॉ. आर. एस. फुन्ने, डॉ. मीनानाथ गोमचाळे आणि मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पदक देऊन करण्यात आले. डॉ. आनंद भट हिंगोली, डॉ. चंद्रकात सातपुते गंगाखेड, डॉ. ज्योतीराम चव्हाण वसमत, डॉ. हेमंत शिंदे सेनगाव, नसीफ पैलवान हिंगोली, डॉ. संदीप लोंढे हिंगोली, डॉ. साहेबराव देवकते औंढा, प्रा. बुरकुंडे पूर्णा, डॉ. ज्ञानेश्वर गिरी परभणी, डॉ. संतोष कोकीळ परभणी, डॉ. पवन पाटील मानवत, डॉ. कमलाकर कदम सेलू, डॉ. शाम पाठक परभणी, डॉ. निरज आकमार वसमत, डॉ. माधव कदम परभणी यांची उपस्थिती होती.

# शहीद भगतसिंग जयंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** विश्रांतीनगर, जय भवानीनगर शाखा AISF व भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने परिवर्तन कॉम्प्युटर्स येथे भगत सिंग यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित केला होता या वेळी AISF च्या माजी जिल्हा अध्यक्ष कॉ वसुधा कल्याणकर यांनी भगतसिंग यांच्या बद्दल सविस्तर माहिती दिली. कल्याणकर यांनी आपल्या भाषणात भगतसिंग यांच्याबद्दल सविस्तर माहिती देऊन आजच्या विद्यार्थ्यांनी भगत सिंगाचा आदर्श घेऊन वाटचाल करावी असं सांगितलं. AISF चे माजी राज्य सहसचिव कॉ मधुकर खिल्लारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात अजय चव्हाण यांनी भगतसिंग च्या क्रांती गीतांनी केली. सुत्रसंचालन कावेरी दळवी हिने तर आभार मयुरी कमोदे हिने मानले. या वेळी प्रमुख उपस्थिती म्हून भाकप शाखा सचिव सुरेश ठोंबरे कॉ संजय अंभोरे कॉ निर्मला वाकोडे ग्रामपंचायत सदस्य सत्यजित गायकवाड हे होते. आशिष रणदिवे सोनाली गायकवाड ,नेहा म्हस्के, कल्याण चोरमारे, सुगम गुंड, यश वाडेकर, अश्विनी निकम प्रियांका डोकळे, कोमल गिरी,शुभम कदम,संतोष प्रधान,प्रीती हिवाळे, प्रतीक्षा अहिरे, संध्या मोरे याची उपस्थित होती.



# शहीद भगतसिंग जयंतीनिमित्त कार्यक्रम



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आज शहीद भगतसिंग यांच्या 115 व्या जयंतीचा कार्यक्रम विठ्ठल चौक येथे महाविकास आघाडी व कमेंट पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यापारी संघटनेचे अध्यक्ष गंगाराम कापसे, रामू राजपूत, भास्कर लहाने, ज्ञानेश्वर खंदारे, जगदीश आबा, शिवाजीराव काळे, वल्लभ भंडारी दशरथ मानवतकर, प्रवीण घाटविसावे, संतोष सोनटक्के, चंदू काळे, मनोज रणदिवे, अमोल संकपाळ, प्रकाश पाटील, कारभारी वाहूळ, मिलिंद काकडे, सूर्यकांत कासनाळे, शामराव शिंदे इत्यादींच्या उपस्थितीत पार पडला यावेळी शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमाचे आयोजन कॉंग्रेस पक्षाचे शहर सचिव सुभाष पाटील पांडभरे व कॉम्रेड भास्कर लहाने यांनी केले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल संकपाळ, शामराव शिंदे, चंद्रमणी काळे, आतिश गवळे प्रकाश पाटील आदींनी परिश्रम घेतले.

# प्रभाग क्रमांक १९ येथे रस्ता कॉंक्रीटीकरणाचा आ. फारुक शहा यांच्या हस्ते शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील आमदार फारुक शहा यांच्या कामाचा धडाका वेगाने सुरू असताना शहरातील प्रभाग क्र . १९ मध्ये विविध विकास कामांचा आ.फारुक शाह यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला . या विकास कामांकरीता २४ लाखाचा निधी करण्यात झाला असून यातुन सुलतानिया मदरसा गट नं .३१ , मळा भागापर्यंत रस्ता जामचा कॉंक्रिटीकरण काम करण्यात येणार असल्याचे आ. फारूक शाह म्हणाले छोटू हाजी जिल्हाध्यक्ष नासिर याप्रसंगी शहराध्यक्ष मुक्तार अन्सारी, जिल्हाध्यक्षा डॉ. दीपश्री नाईक, फातेमा अन्सारी, नगरसेवक बेग, नगरसेवक गनी डॉलर, नगरसेवक पठाण, माजी नगरसेवक साबीर सैय्यद, साजिद साई, निजाम सैय्यद, आसिफ मुल्ला, आसिफ सईद आमिर शाह, रफिक शाह पठाण युसुफ पापा, निसार अन्सारी, मौलवी शकील, वसिम



मंसुरी, शोएब मुल्ला, हलीम समसुद्दिन, खालिद अन्सारी रियाज शाह, रफिक काझी, फैजल अन्सारी, माजीद पठाण, फिरोज शाह, सउद सरदार, इब्राहिम पठाण, शाहिद शाह, सलमान खान, फहीम अन्सारी, प्यारेलाल पिंजारी, नुरुद्दीन पिंजारी रशीद खान, नजिर पटेल, अझर सैय्यद समीर शेख, सलीम पिंजारी, अजिज शेख, हनीफ बेग, जुबेर शेख, शकिला अन्सारी, फर्जाना शाह आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष मौलवी मोबिन यांची उपस्थिती होती. रस्त्याचे काम सुरू झाल्यामुळे परिसरातील नागरिकांनी आ. फारुख शाह यांचा सत्कार करून आभार मानले आहेत .

# महाकालीच्या दर्शनासाठी वाढली भाविकांची गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** नवरात्रोत्सवानिमित्त येथील ऐतिहासिक महाकाली मंदिरात विदर्भ, मराठवाडा, आंध्रप्रदेश, तेलगंणातील भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. आदिवासी गोंड राजाने बांधलेल्या किल्ल्याच्या परकोटावर नतमस्तक होऊन भाविक माता महाकालीचे दर्शन घेत आहेत. यंदा पहिल्यांदाच येथे माता महाकाली महोत्सव साजरा होत आहे. यामुळे मंदिर परिसरातील आकर्षक विद्युत रोषणाई लक्षवेधी ठरत आहे. गोंडराजा खांडक्या बल्लाळशाह शिकारीच्या निमित्ताने या परिसरातील जंगलात फिरत होता. फिरता फिरता तो देवीच्या या मूळ गुफेकडे आला. तेथील पाण्याने चेहऱ्यावरील व्रण साफ केले असता, ते नाहीसे झाले. पुढे त्याला स्वतः महाकालीने दृष्टांत दिला. स्वतः चे स्थान सांगितले. दुसऱ्याच दिवशी राजाने जंगलातील भुयारी मार्ग शोधून गुफा मोकळी केली. त्यामुध्ये देवीची कोरीव मूर्ती सापडली. राजाने तेथे छोटेखानी मंदिर बांधले, अशी एक आख्यायिका आहे. दुसऱ्या आख्यायिकेनुसार, आजच्या मंदिराची निर्मिती ही राणी हिराईने १७ व्या शतकात केली.

१७०७ ते १७०९ हा या मंदिराच्या उभारणीचा काळ. देवगडचा राजा दुर्गशाह व गोंडराजा वीरशाह (बिरसिंग) यांच्यात लढाई झाली होती. वीरशाहचा पाडाव होऊ लागला होता. अचानक 'जय महाकाली'चा जयघोष झाला आणि वीरशाहाच्या सैन्यात चैतन्य संचारले. युद्धात राजा वीरशाहचा विजय झाला. महाकालीच्या कृपेनेच लढाईत विजय झाल्याचा राणी हिराईचा दृढ समज झाला. या कृतज्ञतेतून तिने मंदिराचा कायापालट केल्याची अख्यायिका सांगितली जाते.

# दिव्या चव्हाणला कराटे स्पर्धेत सिल्वर मेडल

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** घाणेगाव तांडा या गावाची



दिव्या सुरेश चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा जळगाव कराटे स्पर्धेत सिल्वर मेडल मिळवून गावचे नाव उज्ज्वल केले. जळगाव येथे झालेल्या राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत दिव्या चव्हाण याने चांगल्या खेळाचे प्रदर्शन करीत सिल्वर मेडल चा मान मिळवला. स्वच्छ सुंदर ग्राम स्पर्धेत दिल्लीपर्यंत गावचा डंका मिरविलेल्या घाणेगाव गावाने या निमित्ताने आणखी एकदा उत्तुंग यश मिळविले आहे. या खेळासाठी सुरेश चव्हाण, रत्ना ताई चव्हाण सरपंच, सुनील चव्हाण व शिक्षकांनी मार्गदर्शन केले. त्याच्या या यशाबद्दल सभापती, सरपंच, उपसरपंच यासह ग्रामस्थांनी त्याचे कौतुक केले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टॅंड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in